"सातारा, वाई, पांचगणी व महाबळेश्वर नगर परिषद तसेच प्रादेशिक योजना, महाबळेश्वर पांचगणी क्षेत्र" या करिता
वारसास्थळ जतन समिती

---

जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा येथे दि. ०४/०८/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न

**झालेल्या बैठकीचे इतिवृत्त**

"सातारा, वाई, पांचगणी व महाबळेश्वर नगर परिषद तसेच प्रादेशिक योजना, महाबळेश्वर पांचगणी क्षेत्र" या करिता वारसास्थळ जतन समितीची सहावी बैठक मा. दिलीप बंड, I.A.S. (Retired) यांच्या अध्यक्षतेखाली दि. ०४/०८/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता पहिला मजला, मिटींग हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस वारसास्थळ जतन समितीचे बैठकीस खालील सन्मा. सदस्य व निमंत्रित सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्य | पद |
|---|---|---|
| १ | मा. दिलीप बंड, I.A.S. (Retired) | अध्यक्ष |
| २ | मा.श्रीमती श्वेता सिघंल, I.A.S. जिल्हाधिकारी सातारा | सदस्य |
| ३ | मा.श्री.अविनाश पाटील, सहसंचालक, नगर रचन, पुणे विभाग, पुणे | सदस्य |
| ४ | मा.डॉ. श्री. जय शा. सामंत, पर्यावरणतज्ञ | सदस्य |
| ५ | मा.डॉ. श्री.शिवाजीराव चव्हाण, इतिहास तज्ञ | सदस्य |
| ६ | मा.अधिक्षक, पुरातत्व विद, भारतीय पुरातत्व विभाग यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ७ | श्री. वि.ल. वाघमोडे, सहायक संचालक, नगर रचना, सातारा | सदस्य सचिव |
| ८ | उपवनसंरक्षक, सातारा | विशेष निमंत्रक |
| ९ | कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम विभाग, सातारा | विशेष निमंत्रक |
| १० | मुख्याधिकारी, सातारा नगर परिषद | विशेष निमंत्रक |
| ११ | मुख्याधिकारी, महाबळेश्वर गिरीस्थान नगर परिषद | विशेष निमंत्रक |
| १२ | मुख्याधिकारी, पाचगणी गिरीस्थान नगर परिषद | विशेष निमंत्रक |
| १३ | मुख्याधिकारी, वाई नगर परिषद | विशेष निमंत्रक |

सहायक संचालक, नगर रचना, सातारा तथा सदस्य सचिव, वारसा स्थळ जतन समिती यांनी मा. अध्यक्ष व मा. सदस्य तसेच उपस्थितांचे स्वागत करुन मा. अध्यक्षांच्या अनुमतीने आवश्यक गणपुर्ततेच्या खातरजमेअंती बैठकीचे कामकाज सुरु केले. खालील विषयी विषयनिहाय सादरीकरण व चर्चा होऊन पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.



Scanned by CamScanner

| अ.क्र | विषय | | चर्चा / निर्णय | अपेक्षित कार्यवाही यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ |
| १ | **विषय क्र.१** | वारसा स्थळ जतन समितीची दि. १८/११/२०१७ रोजी संपन्न झालेल्या सातव्या बैठकीचे इतिवृत्त कायम करणे व सातव्या बैठकीनंतर आजपर्यंत केलेल्या कार्यवाहीस मान्यता देणेबाबत. | वारसा स्थळ जतन समितीच्या दि.१८/११/२०१७ रोजी संपन्न झालेल्या सातव्या बैठकीचे इतिवृत्तातील अ.क्र.९ बाबत चर्चा झाली. वाई नगर परिषद हद्दीतील वारसा स्थळांच्या यादी संदर्भात मुख्याधिकारी, वाई नगर परिषद यांनी सुनावणी घेवून ९० मिळकती वगळल्या होत्या व त्यास समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली होती. तथापि, यामध्ये अंतर्भूत असलेल्या शासकीय मिळकती वगळू नयेत, याबाबत समिती सदस्या श्रीमती वैशाली लाटकर यांनी दि.२१/१२/२०१७ रोजी ई मेलव्दारे सुचना दिली आहे. वाई नगर परिषदेकडून अशा शासकीय मिळकतींची माहिती घेतली असता, मुख्याधिकारी यांनी वगळण्यात आलेल्या हेरिटेज मिळकतीमध्ये ५ शासकीय मिळकती असल्याचे कळविले आहे. याबाबत सविस्तर चर्चा होवून यापूर्वी दि.१८/११/२०१७ रोजीच्या बैठकीत घेतलेला निर्णय कायम ठेवण्यात आला. तद्वत बैठकीचे इतिवृत्त कायम करण्याची विनंती सदस्य सचिव यांनी केली, त्यास मा.अध्यक्ष यांनी सर्वानुमते मान्यता दिली. | ---- |
| २ | **विषय क्र.१** सातव्या बैठकीनंतर आजपर्यंत केलेल्या कार्यवाहीस मान्यता देणेबाबत. | <u>समितीची चौथी बैठक अ.क्र. ३ :-</u> हेरिटेज नियमावलीतील दुरुस्त्यां बाबत. | BEAG तर्फे श्रीमती हेमा रमाणी यांनी चारही नगर परिषदांच्या नियमावलीत एकसारखेपणा येणे कामी नियमावलीत काही दुरुस्त्या सुचविल्या आहेत. मागील बैठकीत दिलेल्या सूचनेनुसार या कार्यालयाने पत्र क्र. ३९१७, दि. ३०/११/२०१७ तसेच पत्र क्र. २२८१, दि.१८/०७/२०१८ अन्वये कार्यवाही त्वरित करणेबाबत सर्व नगरपरिषदांना सूचना देण्यात आलेल्या असल्याचे तसेच हेरिटेज नियमावलीत बदल करुन म.प्रा.व न.र. अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करुन कोणत्याही नगरपरिषदांनी अहवाल सादर केला नसल्याचे माहिती सदस्य सचिवांनी दिली.<br>याबाबत सविस्तर चर्चा होवून सदर संस्थेने सादर केलेली नियमावली व शासनाने मंजूर केलेली नियमावली याअनुषंगाने तुलनात्मक तक्ता तयार करुन याबाबतचा अहवाल सदस्य सचिव यांनी पुढील बैठकीत सादर करणेबाबत सर्वानुमते ठरले. | सदस्य सचिव |
| ३ | **विषय क्र.१** सातव्या बैठकीनंतर आजपर्यंत केलेल्या कार्यवाहीस मान्यता देणेबाबत. | समितीची पाचवी <u>बैठक विषय क्र. २ -</u> सातारा शहरातील जुना व नवा राजवाडा या ऐतिहासिक वास्तुंची दखल घेणेबाबत मा.श्री. शिवेंद्रसिंहराजे भोसले (विधानसभा सदस्य) यांचे अर्जावर विचार करणे. | सातारा शहरातील जुना राजवाडयामध्ये जिल्हापरिषदेचे छ. प्रतापसिंह हायस्कुल कार्यरत असून सदर इमारतीची देखभाल होत नसलेने तेथे परिसरात झुडपे वाढून सरपटणा-या प्राण्यांचा धोका असल्याचे डॉ.चव्हाण यांनी समितीच्या निदर्शनास आणून दिले आणि सदर राजवाडयामध्येच काही भागात जिल्हा परिषदेने नवीन वसतीगृह बांधले असून त्यामध्ये छ.प्रतापसिंह हायस्कूल स्थलांतरित करण्याचा मुद्दा त्यांनी व कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, सातारा यांनी मांडला. सदर बाब वारसा स्थळ जतन समितीच्या कार्यकक्षेत येत नसल्याबाबत बैठकीमध्ये मत व्यक्त करण्यात आले.<br>सदर राजवाडयांमध्ये प्रस्तावित दुरुस्त्यांच्या अनुषंगाने आर्किटेक्ट श्री.रवी कदम यांनी सादरीकरण | कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, सातारा |



Scanned by CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | केले. प्रस्तुत इमारतीचे संरचना (Structure) बदलणेस परवानगी नसल्याचे जिल्हाधिकारी, सातारा यांनी मत व्यक्त केले. प्रस्तावित दुरुस्त्यांमध्ये प्रामुख्याने आठ प्रकारचे बदल / दुरुस्त्या प्रस्तावित असल्याचे सदस्य सचिव तथा सहायक संचालक, नगर रचना, सातारा यांनी सांगितले. प्रस्तावित दुरुस्त्या मोठया स्वरुपाच्या असल्याने सदर राजवाडयांच्या पुनर्रचना व दुरुस्त्यांचा सविस्तर प्रस्ताव व त्याचे सादरीकरण पुढील बैठकीत सादर करण्याबाबत सुचना देण्यात आल्या. | |
| ४ | विषय क्र. १ सातव्या बैठकीनंतर आजपर्यंत केलेल्या कार्यवाहीस मान्यता देणेबाबत. | समितीची पाचवी बैठक विषय क्र. ५- पांचगणी नगर परिषद हद्दीतील मार्केट या रस्त्यावरील मिळकतींचा सर्वेक्षण अहवाल समिती समोर सादर करणेबाबत. | पांचगणी नगरपरिषद हद्दीतील बाजार ग्रेड - I सन्मुख मिळकतींचा सर्व्हे नगरपरिषदेने करुन याबाबतचे धोरण निश्चित करणे आवश्यक असलेने, बाजार ग्रेड - I या मुख्य रस्त्यास सन्मुख असलेल्या मिळकतींना सर्व इमारतींचे फसाड / इलेव्हेशन बाबत शासनाच्या Science and Techonology Park, Pune या संस्थेशी मुख्याधिकारी यांनी प्रत्यक्ष संपर्क साधुन याबाबत पुढील एक महिन्याच्या कालावधीत कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याच्या सुचना मा.अध्यक्षांनी मुख्याधिकारी पांचगणी गिरीस्थान नगरपरिषद यांना दिल्या होत्या. त्यानुसार पत्र क्र.३९१७, दि. ३०/११/२०१७ अन्वये मुख्याधिकारी, पांचगणी नगर परिषद यांना सदर संस्थेस संपर्क करुन इमारतीचे फसाड/ इलिव्हेशन बाबत कार्यवाही करणेबाबत या कार्यालयाने कळविले असल्याची माहिती सदस्य सचिव यांनी दिली.<br>याबाबत सविस्तर चर्चा झाली. तसेच मा.अध्यक्ष यांनी संबंधीत अधिका-यांशी दुरध्वनीवरुन चर्चा करुन इमारतीचे फसाड / इलिव्हेशन सत्वर उपलब्ध करुन देण्यात यावे, अशा सूचना त्यांना मा.अध्यक्षांनी दिल्या. याशिवाय समितीच्या बैठकीत उपस्थित असलेले वास्तुविशारद श्री.महेंद्र चव्हाण व श्री.रवी कदम यांना महाबळेश्वर व पाचगणी दोन्ही बाजारमधील सन्मुख मिळकतींचे समोरील इलेव्हेशनचे डिझाईन लवकरात लवकर तयार करुन उपलब्ध करुन देणेबाबत सूचना देण्यात आल्या. त्यानुसार या इलेव्हेशनबाबत पुढील बैठकीत निर्णय घेण्यात येईल, असे सर्वानुमते ठरले. | संबंधित व पाठपुरावा सदस्य सचिव |
| ५ | विषय क्र.१ सातव्या बैठकीनंतर आजपर्यंत केलेल्या कार्यवाहीस मान्यता देणेबाबत. | समितीची सहावी बैठक विषय क्र. ६- महाबळेश्वर नगर परिषद हद्दीतील डॉ.साबणे रोड बाजार ग्रेड-३ या वरील मिळकतींचा सर्वेक्षण अहवाल तसेच बांधकाम परवानगी बाबत. | वर अ.क्र.४ मध्ये नमूद नुसार | संबंधित व पाठपुरावा सदस्य सचिव |
| ६ | विषय क्र.१ सातव्या बैठकीनंतर आजपर्यंत केलेल्या | वाई नगरपरिषद हद्दीतील वारसा स्थळांची अंतिम यादी तयार करताना वगळलेल्या | वर अ.क्र.१ मध्ये नमूद नुसार | मुख्याधिकारी, वाई नगरपरिषद |



Scanned by CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | कार्यवाहीस मान्यता देणेबाबत. | स्थळांबाबत कारणमिमांसेसह मुख्याधिकारी वाई न.प. यांचे सादरीकरण. | | |
| ७ | विषय क्र.२ | सातारा नगरपरिषद हद्दीतील वारसास्थळांची अंतिम यादी तयार करताना वगळलेल्या स्थळांबाबत कारणमिमांसेसह मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद यांचे सादरीकरण. त्याचबरोबर BEAG, मुंबई यांचे तर्फे श्रीमती हेमा रमाणी यांचे सादरीकरण. | सातारा नगरपरिषद हद्दीतील वारसास्थळांची अंतिम यादी तयार करताना वगळलेल्या स्थळांबाबत सादरीकरण मुख्याधिकारी व नगर रचनाकार, नगर परिषद, सातारा यांनी केले. एकूण १४९ वारसा स्थळांपैकी १११ वगळण्याचे प्रस्तावित असून ३८ वारसा स्थळे कायम ठेवण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच वगळण्यात आलेल्या १११ मिळकतींबाबतची कारणमिमांसा सादर करण्यात आली. या वगळलेल्या १११ मिळकतींपैकी ३० मिळकती हेरिटेज यादीमध्ये अंतर्भूत करणेबाबतचा प्रस्ताव BEAG मुंबई तर्फे श्रीमती हेमा रमाणी यांनी सादर केला आहे. त्या अनुषंगाने त्यांनी समितीसमोर सादरीकरण केले. त्यामध्ये प्रामुख्याने शासकीय मिळकतींचा समावेश असल्याचे त्यांनी सांगितले. या विषयाच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा होवून समितीमधील वारसा स्थळ संवर्धन वास्तुविशारद (Conservation Architect) श्रीमती वैशाली लाटकर व श्री.चेतन सहस्त्रबुध्दे, सदस्य सचिव यांच्या उपसमितीने मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद यांच्या उपस्थितीत या ३० मिळकतींची संयुक्त पाहणी करुन अहवाल सादर करावा. सदर पहाणीवेळी BEAG मुंबई तर्फे श्रीमती हेमा रमाणी हया उपस्थित राहून उप समितीस सहकार्य करतील, असे मा.अध्यक्षांनी विषद केले. उप समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर याबाबतचा निर्णय पुढील बैठकीत घेण्यात येईल, असा निर्णय झाला. | उपसमिती व मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद |
| ८ | विषय क्र.३ | सातारा नगर परिषद हद्दीतील सि.स.नं. ४५५/२/२०क-६ पेठ सदर बझार या मिळकती मध्ये दि.रयत सेवक को.ऑप.बॅक लि., सातारा यांच्या बांधकाम परवानगीबाबत. | सातारा नगर परिषद हद्दीतील सि.स.नं. ४५५/२/२०क-६ पेठ सदर बझार या मिळकतीमध्ये दि. रयत सेवक को. ऑप. बॅक लि., सातारा यांच्या बांधकाम परवानगीबाबत संबंधीत वास्तुविशारद श्री.सुहास तळेकर यांनी समितीसमोर सादरीकरण केले. त्यामध्ये दि. रयत सेवक को. ऑप. ब्रॅकेची इमारत जुनी व पडीक झाली होती. या जागेवर सातारा नगर परिषदेने दि.१३/०८/२०१२ रोजी बांधकाम परवानगी दिली होती. त्यानुसार सदर इमारत पाडण्यात आली असल्याची माहिती त्यांनी समितीस दिली. प्रस्तुत इमारत आता अस्तित्वात नसल्याने, वैयक्तिक या प्रस्तावाच्या मर्यादेपुरतेच, तेथील नियोजित बांधकामास परवानगी देण्यास हरकत नसल्याचे व त्यानुसार मा.अध्यक्षांच्या मान्यतेने आदेश निर्गमित करण्याचे बैठकीमध्ये ठरले. | सदस्य सचिव |
| ९ | विषय क्र.४ | महाबळेश्वर येथील महाबळेश्वर क्लब या जागेतील काही जुन्या इमारती पाडून त्याच ठिकाणी नवीन इमारतीच्या बांधकामाबाबत. | महाबळेश्वर क्लब या मिळकतीची सन १९८९ साली दिलेली शेवटची बांधकाम परवानगी कार्यालयाच्या अभिलेखात उपलब्ध असल्याचे माहिती मुख्याधिकारी, महाबळेश्वर गिरिस्थान नगर परिषद यांनी दिली. यावर सविस्तर चर्चा होवून यापूर्वीची दि.०७/१२/२०१६ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्तात नमूद केल्यानुसार सदर जुन्या इमारती अधिकृत आहेत अगर कसे, याबाबत मंजुर बांधकाम नकाशे, सिटी सर्व्हे शिटस् व पुर्व विकास | मुख्याधिकारी, महाबळेश्वर गिरिस्थान नगर परिषद |



Scanned by CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | योजनेचा विद्यमान जमीन वापर नकाशा इ. आधारे तपासणी करणे आवश्यक आहे. सर्व विद्यमान इमारतींच्या अधिकृततेबाबत तपासणी केल्यानंतर ज्या विद्यमान इमारती मूळ मंजुर नकाशावर/ सिटी सर्व्हे शिटवर / पुर्व विकास योजनेच्या विद्यमान जमीन वापर नकाशा इत्यांदीवर नसतील तर त्या इमारती निष्कासित करणेसंबंधाने विहित कार्यवाही मुख्याधिकारी, महाबळेश्वर गिरीस्थान नगर परिषद यांनी करणे आवश्यक आहे. याबाबतचा अहवाल मुख्याधिकारी, महाबळेश्वर गिरीस्थान नगर परिषद यांनी पुढील बैठकीच्या वेळी सादर करणेबाबत मा. अध्यक्ष यांनी सूचना दिल्या. | |
| १० | विषय क्र.५ | महाबळेश्वर येथील सि.स.नं. १३३ ब खाईस्ट चर्च येथील अनधिकृत बांधकामावर कार्यवाही करणेबाबत. | या जागेवर झालेल्या अनधिकृत बांधकामाबाबत मा.उच्च न्यायालयात दाखल रिट पिटीशन क्र. ५३९६/२०१८ मध्ये दि.०४/०५/२०१८ रोजीच्या आदेशान्वये मा.उच्च न्यायालयाने फेटाळले आहे, तसेच मनाई हुकुमाचा अर्ज फेटाळला आहे. त्यामुळे सदर अनधिकृत बांधकाम पाडण्याची कार्यवाही त्वरीत करणेबाबत मा.अध्यक्षांनी मुख्याधिकारी, महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषद यांना सूचना दिल्या. | मुख्याधिकारी, महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषद |
| ११ | विषय क्र.६ | नगर परिषदांकडुन प्राप्त प्रस्तावावर चर्चा. अ) महाबळेश्वर येथील डॉ. साबणे रोड या रस्त्यास सन्मुख सि.स.नं. ३ या जागेवरील बांधकाम परवानगीबाबत- श्रीमती सुलोचना दत्तात्रय बावळेकर व इतर एक यांचा प्रस्ताव. | महाबळेश्वर येथील डॉ. साबणे रोड या रस्त्यास सन्मुख सि.स.नं.३ या जागेवरील बांधकामास सहायक संचालक, नगर रचना, सातारा यांनी पत्र क्र.३८१६, दि.२४/११/२०१७ अन्वये मंजूरीची शिफारस केली असल्याची माहिती सदस्य सचिव यांनी दिली. याबाबतचे सादरीकरण वास्तुविशारद श्री.सूर्याजी पाटील यांनी केले. सदर मिळकत डॉ.साबणे रोड या हेरिटेज मिळकतीस सन्मुख असल्याने या इमारतीच्या फसाड / इलेव्हेशनबाबत चर्चा झाली. समितीच्या पुढील बैठकीत फसाड / इलेव्हेशनबाबत अंतिम निर्णय होणार असल्याने सदर फसाड / इलेव्हेशननुसार काम करण्याच्या अटीस अनुसरुन सदर जागेवरील बांधकाम परवानगीबाबत समितीने मान्यता दिली. त्यानुसार सविस्तर आदेश पारित करण्याच्या सूचना मा.अध्यक्षांनी सदस्य सचिवांना दिल्या. | सदस्य सचिव |
| | | ब) महाबळेश्वर येथील डॉ. साबणे रोड या रस्त्यास सन्मुख सि.स.नं. ४ या जागेवरील बांधकाम परवानगीबाबत- श्री. सचिन हरीनारायण रांदड यांचा प्रस्ताव. | महाबळेश्वर येथील डॉ. साबणे रोड या रस्त्यास सन्मुख सि.स.नं.४ या जागेवरील बांधकामास सहायक संचालक, नगर रचना, सातारा यांनी पत्र क्र.१८२९, दि.२०/०६/२०१८ अन्वये मंजूरीची शिफारस केली असल्याची माहिती सदस्य सचिव यांनी दिली. याबाबतचे सादरीकरण वास्तुविशारद श्री.गणेश धायगुडे यांनी केले. सदर मिळकत डॉ.साबणे रोड या हेरिटेज मिळकतीस सन्मुख असल्याने या इमारतीच्या फसाड / इलेव्हेशनबाबत चर्चा झाली. समितीच्या पुढील बैठकीत फसाड / इलेव्हेशनबाबत अंतिम निर्णय होणार असल्याने सदर फसाड/ इलेव्हेशननुसार काम करण्याच्या अटीस अनुसरुन सदर जागेवरील बांधकाम परवानगीबाबत समितीने मान्यता दिली. त्यानुसार सविस्तर आदेश पारित करण्याच्या सूचना मा.अध्यक्षांनी सदस्य सचिवांना दिल्या. | सदस्य सचिव |
| | | क) महाबळेश्वर येथील सि.स.नं. २०२ | महाबळेश्वर येथील सि.स.नं. २०२ अ शिंदोळा पार्क ही मिळकत हेरिटेज ग्रेड-I आहे. विषयांकित जागेवरील | संबंधित व समिती तसेच मुख्याधिकारी, |



Scanned by CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | अ शिंदोळा पार्क ग्रेड-I या हेरिटेज मिळकतीस दुरुस्तीसह हेरिटेज हॉटेलसाठी परवानगी मिळणेबाबत – उमाराजे गंगाधरराव उर्फ बाळासाहेब पटवर्धन व एक यांचा प्रस्ताव | विद्यमान इमारतींना दुरुस्तीसह हेरिटेज हॉटेलसाठी परवानगी मिळणेबाबत अर्ज सादर केला असल्याची माहिती सदस्य सचिव यांनी समितीस दिली. याबाबतचे सादरीकरण अर्जदारांच्या वतीने वास्तुविशारद श्री.महेंद्र चव्हाण यांनी केले. सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा होवून पुढील बैठकीच्या दिवशी सदर सर्व इमारतींची पाहणी करुन त्यानंतर याबाबतचा निर्णय पुढील बैठकीत घेण्यात येईल, असा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. | महाबळेश्वर गिरीस्थान नगर परिषद |
| | | ड) महाबळेश्वर येथील वेण्णा लेक विकास- मुख्याधिकारी, महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषद यांचा प्रस्ताव | महाबळेश्वर गिरीस्थान नगर परिषद हद्दीतील वेण्णा लेक परिसराचा विकास करणेबाबतचा प्रस्ताव मुख्याधिकारी, महाबळेश्वर गिरीस्थान नगर परिषद यांनी सादर केला असल्याची माहिती सदस्य सचिव यांनी समितीस दिली. या विषयाबाबतचे सादरीकरण वास्तुविशारद श्रीमती वंदना लब्बा यांनी केले. सदरचा प्रस्ताव राष्ट्रीय लेक संवर्धन योजनेअंतर्गत हाती घेणेत येणार असल्याची माहिती मुख्याधिकारी यांनी दिली. यावेळी मा.अध्यक्षांनी या विषयाबाबत यापूर्वीचे दि.०५/१०/२०१६ रोजीच्या बैठकीत चर्चा झाली असुन, सदर बैठकीत वेण्णा लेक संवर्धन योजनेस प्राथमिक मान्यता यापूर्वीच दिले असून वेण्णा लेक संवर्धनाबाबतचा प्रारुप आराखडा (DPR) तयार करुन तो अंतिम मंजूरीसाठी हेरिटेज कमिटीसमोर सादर करण्याबाबतचा निर्णय यापूर्वीच झाला असल्याचे नमूद केले.<br>यावेळी उपवनसंरक्षक श्री.अंजनकर साहेब यांनी वेण्णा लेक तलावाची जागा मूळ वन विभागाची असून वन विभागाने सदर जागा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे हस्तांतरण केली असल्याची माहिती दिली. या अनुषंगाने सविस्तर चर्चा होवून सदर प्रस्तावाखालील जागेची संयुक्त पाहणी वन विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व नगरपरिषद यांनी एकत्रित करुन सदर प्रस्तावास सर्व संबंधीत विभागाची पूर्व मान्यता घेणे आवश्यक असल्याचे बैठकीत ठरले. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना मा.अध्यक्षांनी मुख्याधिकारी, महाबळेश्वर यांना दिल्या. | मुख्याधिकारी, महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषद |
| | | इ) पांचगणी नगरपरिषद हद्दीतील नगर रचना योजना क्र. ३, अं.भू.क्र. १७०, डॉ. सावंत मार्केट विकसित करणे या प्रस्तावावर पुर्नविचार करणे - मुख्याधिकारी, पांचगणी गिरिस्थान नगरपरिषद यांचा प्रस्ताव | पांचगणी नगरपरिषद हद्दीतील नगर रचना योजना क्र. ३, अं.भू.क्र. १७०, डॉ. सावंत मार्केट विकसित करणे या प्रस्तावाचे आर्किटेक्ट श्री.रवी कदम यांनी सादरीकरण केले. सदर जागा पांचगणी येथील गावठाणामध्ये बाजार पेठेतील छ.शिवाजी महाराज चौकाजवळ स्थित असून तेथील वाहनतळाच्या समस्या सोडवण्याच्या दृष्टीकोनातून त्यामध्ये स्टील्ट व त्यावरील पहिल्या मजल्यावर पार्किंग आणि दुस-या मजल्यावर दुकान गाळे प्रस्तावित असल्याचे त्यांनी सांगितले. सदर प्रकल्पामध्ये सुमारे ६० कारचे पार्किंग नियोजित असल्याचे त्यांनी समितीसमोर स्पष्ट केले. सदर प्रकल्पामुळे त्याठिकाणी वाहनांची गर्दी होवू शकेल, असे मत समितीमध्ये व्यक्त करण्यात आले. या प्रकल्पातील प्रस्तावित वाहनतळाकडे जाण्याकरिता एकेरी वाहतूकीच्या माध्यमातून वाहतूक | संबंधित व मुख्याधिकारी, पाचगणी गिरीस्थान नगरपरिषद |



Scanned by CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | व्यवस्था केल्यास पार्किंग व वाहतूकीच्या कोंडीची समस्या निर्माण होत नसल्याचे श्री.रवी कदम यांनी स्पष्ट केले. सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा होवून पुढील बैठकीच्या दिवशी सदर मिळकतीची पाहणी करुन त्यानंतर याबाबतचा निर्णय घेण्यात येईल, असा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. | |
| | | ई) सातारा नगरपरिषद हद्दीतील जिल्हा परिषदे चे प्रतापसिंह हायस्कुल, सातारा येथील हेरिटेज इमारतीच्या दुरुस्तीबाबत- कार्यकारी अभियंता, सातारा जिल्हा परिषद, बांधकाम विभाग, उत्तर, सातारा यांचा प्रस्ताव | वर अ.क्र.३ मध्ये नमूद नुसार | कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, सातारा |

समितीच्या पुढील बैठकीची संभाव्य तारीख ही दि.२०/१०/२०१८ रोजी दुपारी ०२.०० वाजता राजभवन, महाबळेश्वर येथे घेण्याचे निश्चित झाले, सदर बैठकीपूर्वी महाबळेश्वर येथील शिंदोळी पार्क या मिळकतीची पाहणी करण्याचे निश्चित झाले. याबाबतचे नियोजन मुख्याधिकारी, महाबळेश्वर गिरीस्थान नगर परिषद यांनी करण्याचे मा.अध्यक्ष यांनी सुचना दिल्या तसेच मा.अध्यक्ष यांच्या परवानगीने उपस्थितांचे आभार मानुन बैठक संपल्याचे सदस्य सचिव यांनी जाहीर केले .

सही/-
**वि.ल.वाघमोडे**
सदस्य सचिव,
वारसा स्थळ जतन समिती,
तथा
सहायक संचालक, नगर रचना, सातारा

सही/-
**दिलीप बंड** I.A.S. (Retd)
अध्यक्ष,
वारसा स्थळ जतन समिती,
महाबळेश्वर, पांचगणी, वाई, सातारा नगर परिषद
व महाबळेश्वर-पांचगणी प्रदेश

---

जिल्हा परिषद विस्तारीत इमारत,
पहिला मजला, सातारा – ४१५००१
दुरध्वनी क्र.०२१६२/२३९२४१.
जा.क्र.वा.स.ज.स./बै.क्र.७/इतिवृत/
ससंसा/ 2603
सातारा दिनांक 20/०८/२०१८

प्रति,

---------------------------
---------------------------
---------------------------

२/- वारसा स्थळ जतन समितीचे दि.०४/०८/२०१८ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत माहितीसाठी व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी.

20/08/2018
( वि.ल.वाघमोडे )
सदस्य सचिव,
वारसा स्थळ जतन समिती,
तथा
सहायक संचालक, नगर रचना, सातारा

\\Tpsatara\Kamble\वारसा स्थळ जतन समिती इतिवृत व कार्यपूर्ती इतिवृत आठवी बैठक दि 04-08-2018.doc7

Scanned by CamScanner

"सातारा, वाई, पांचगणी व महाबळेश्वर नगर परिषद तसेच प्रादेशिक योजना, महाबळेश्वर पांचगणी क्षेत्र" या करिता
**वारसा स्थळ जतन समिती**

---

राजभवन, महाबळेश्वर येथे दि. २६/१०/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता संपन्न
**झालेल्या बैठकीचे इतिवृत्त**

"सातारा, वाई, पांचगणी व महाबळेश्वर नगर परिषद तसेच प्रादेशिक योजना, महाबळेश्वर पांचगणी क्षेत्र" या करिता वारसा स्थळ जतन समितीची नववी बैठक मा. दिलीप बंड, I.A.S. (Retired) यांच्या अध्यक्षतेखाली दि. २६/१०/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता राजभवन, महाबळेश्वर येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस वारसास्थळ जतन समितीचे बैठकीस खालील सन्मा. सदस्य व निमंत्रित सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्य | पद |
|---|---|---|
| १ | मा. दिलीप बंड, I.A.S. (Retired) | अध्यक्ष |
| २ | मा.श्रीमती श्वेता सिघंल, I.A.S. जिल्हाधिकारी, सातारा तर्फे प्रतिनिधी तहसिलदार, श्रीमती मिनल कळसकर | सदस्य |
| ३ | मा.श्री.अविनाश पाटील, सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे | सदस्य |
| ४ | मा.डॉ. श्री. जय शा. सामंत, पर्यावरण तज्ञ | सदस्य |
| ५ | मा.डॉ. श्री.शिवाजीराव चव्हाण, इतिहास तज्ञ | सदस्य |
| ६ | मा.श्री.चेतन सहस्त्रबुध्दे, कॉन्झर्वेशन आर्कीटेक्ट | सदस्य |
| ७ | मा.श्रीमती वैशाली लाटकर, कॉन्झर्वेशन आर्कीटेक्ट | सदस्य |
| ८ | मा.अधिक्षक, पुरातत्व विद, भारतीय पुरातत्व विभाग यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ९ | श्री. वि.ल. वाघमोडे, सहायक संचालक, नगर रचना, सातारा | सदस्य सचिव |
| १० | उप वन संरक्षक, सातारा तर्फे प्रतिनिधी | विशेष निमंत्रक |
| ११ | कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम विभाग, सातारा | विशेष निमंत्रक |
| १२ | मुख्याधिकारी, सातारा नगर परिषद | विशेष निमंत्रक |
| १३ | मुख्याधिकारी, महाबळेश्वर गिरीस्थान नगर परिषद | विशेष निमंत्रक |
| १४ | मुख्याधिकारी, पाचगणी गिरीस्थान नगर परिषद | विशेष निमंत्रक |
| १५ | मुख्याधिकारी, वाई नगर परिषद, वाई तर्फे प्रतिनिधी | विशेष निमंत्रक |

सहायक संचालक, नगर रचना, सातारा तथा सदस्य सचिव, वारसा स्थळ जतन समिती यांनी मा. अध्यक्ष व मा. सदस्य तसेच उपस्थितांचे स्वागत करुन मा. अध्यक्षांच्या अनुमतीने आवश्यक गणपुर्ततेच्या खातरजमेअंती बैठकीचे कामकाज सुरु केले. खालील विषयी विषयनिहाय सादरीकरण व चर्चा होऊन पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.



Scanned by CamScanner

| अ.क्र | विषय | | चर्चा / निर्णय | अपेक्षित कार्यवाही यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | ४ |
| १ | विषय क्र.१ | वारसा स्थळ जतन समितीची दि. २४/०८/२०१८ रोजी संपन्न झालेल्या आठव्या बैठकीचे इतिवृत्त कायम करणे व आठव्या बैठकीनंतर आजपर्यंत केलेल्या कार्यवाहीस मान्यता देणेबाबत. | वारसास्थळ जतन समितीच्या दि.२४/०८/२०१८ रोजी संपन्न झालेल्या आठव्या बैठकीचे इतिवृत्ताबाबत कोणाचीही हरकत प्राप्त झाली नसलेने बैठकीचे इतिवृत्त कायम करण्याची विनंती सदस्य सचिव यांनी केली, त्यास मा.अध्यक्ष यांनी मान्यता दिली. | ---- |
| २ | विषय क्र.१ आठव्या बैठकीनंतर आजपर्यंत केलेल्या कार्यवाहीस मान्यता देणेबाबत. | <u>समितीची चौथी बैठक</u> <u>अ.क्र. ३ :-</u> हेरिटेज नियमावलीतील दुरुस्त्यांबाबत. | सर्व क्षेत्राकरिता संयुक्तपणे एकच हेरिटेज नियमावली असावी. याबाबत सविस्तर चर्चा होवून सर्व नियमावलीमधील विनियमांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन याबाबतचा अहवाल सदस्य सचिव यांनी पुढील बैठकीत सादर करणेबाबत सर्वानुमते ठरले होते.<br>महाबळेश्वर व पांचगणी गिरीस्थान नगरपरिषदा आणि सातारा व वाई नगरपरिषदा तसेच महाबळेश्वर-पांचगणी प्रादेशिक योजना क्षेत्राकरिता लागू असलेल्या हेरिटेज नियमावलींच्या प्रती व तुलनात्मक तक्त्यांतील माहिती सदस्य सचिव यांचेमार्फत सर्व सदस्यांना ई-मेल द्वारे पुरविण्यात येत असल्याचे सदस्य सचिव यांनी सांगितले. त्यावर सर्व सदस्यांनी सूचना देवून पुढील बैठकीत त्यासंबंधी निर्णय घेणेबाबत ठरले. | सदस्य सचिव |
| ३ | विषय क्र.१ आठव्या बैठकीनंतर आजपर्यंत केलेल्या कार्यवाहीस मान्यता देणेबाबत. | <u>समितीची पाचवी बैठक</u> <u>विषय क्र. २ -</u> सातारा शहरातील जुना व नवा राजवाडा या ऐतिहासिक वास्तुंची दखल घेणेबाबत मा.श्री. शिवेंद्रसिंहराजे भोसले (विधानसभा सदस्य) यांचे अर्जावर विचार करणे. | सातारा शहरातील जुना राजवाडयामध्ये जिल्हापरिषदेचे छ. प्रतापसिंह हायस्कुल कार्यरत असून सदर राजवाडयामध्येच काही भागात वसतीगृहाची इमारत दुरुस्त व पुन:स्थापित करुन त्यामध्ये छ.प्रतापसिंह हायस्कूल स्थलांतरीत करणे व जुन्या राजवाडयाचे दुरुस्ती व पुन:स्थापना करणेनुषंगाने श्री.रवि कदम, वास्तुविशारद यांनी समितीसमोर सविस्तर सादरीकरण केले. सदर प्रस्तावावर बैठकीमध्ये सविस्तर चर्चा होवून प्रस्तुत प्रस्तावास मान्यता देण्यात आली. त्यानुसार स्वतंत्र आदेश पारित करणेबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या. तसेच पुढील कार्यवाही सातारा जिल्हा परिषदेने करुन प्रस्ताव सातारा नगरपरिषदेकडे सादर करण्यात यावा, असे समिती बैठकीत ठरले.<br>नवा राजवाडा हा राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यात असून त्याचे दुरुस्तीबाबत शासनाकडे पत्रव्यवहार झाला असल्याचे बैठकीमध्ये सांगण्यात आले. त्यानुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत शासनाकडे समक्ष व पत्रव्यवहाराच्या माध्यमातून पाठपुरावा करणेबाबत बैठकीमध्ये ठरले. | सदस्य सचिव / कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, सातारा<br><br>अधिक्षक, अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सातारा |
| ४ | विषय क्र. १ आठव्या बैठकीनंतर आजपर्यंत केलेल्या | <u>समितीची पाचवी बैठक</u> <u>विषय क्र. ५-</u> पांचगणी नगर परिषद हद्दीतील मार्केट या रस्त्यावरील मिळकतींचा सर्वेक्षण अहवाल समिती | पांचगणी गिरीस्थान नगरपरिषद हद्दीतील बाजार ग्रेड - I सन्मुख मिळकतींमधील सर्व इमारतींचे फसाड / इलेव्हेशन एकसारखे राहण्याच्या दृष्टीकोनातून त्याबाबतची डिझाइन वास्तुविशारद श्री.रवि कदम यांनी सादर केले असून, पांचगणी येथील बाजारामधील ९०% भाग पुन:स्थापित असल्याने, त्याप्रमाणे त्याठिकाणी | संबंधित व पाठपुरावा सदस्य सचिव |



Scanned by CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | कार्यवाहीस मान्यता देणेबाबत. | समोर सादर करणेबाबत. | अंमलबजावणी करणे शक्य असल्याचे बैठकीमध्ये मत व्यक्त करण्यात आले.<br>महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषद हद्दीतील बाजार ग्रेड - I सन्मुख मिळकतींमधील सर्व इमारतींचे फसाड / इलेव्हेशन एकसारखे राहण्याच्या दृष्टीकोनातून त्याबाबतची डिझाइन वास्तुविशारद श्री.महेंद्र चव्हाण यांनी सादर केले असून, महाबळेश्वर येथे बाजारामध्ये बहुतांश नविन इमारती झाल्या असल्याने व त्यासमोरील ओटा पर्यटकांना येण्याजाण्यासाठी खुला ठेवण्याचा असल्याने त्यानुषंगाने सदर इलेव्हेशन / फसाड एकाच प्रकारचे प्रस्तावित करण्याऐवजी मार्गदर्शक स्वरुपात देणे योग्य होईल, असे श्री.सहस्त्रबुध्दे यांनी मत व्यक्त केले, त्यानुसार महाबळेश्वर येथील बाजारसन्मुख मिळकतींच्या इलेव्हेशन / फसाड करिता समिती सदस्य श्री.सहस्त्रबुध्दे यांनी चार ते पाच प्रकारचे डिझाइन तयार करावेत व मिळकतधारकांना पर्याय देवून त्यानुसार या इलेव्हेशनबाबत अंतिम धोरण ठरवून पुढील बैठकीत निर्णय घेण्यात येईल, असे सर्वानुमते ठरले.<br>वरीलप्रमाणे महाबळेश्वर व पांचगणी येथील बाजार क्षेत्रामधील मिळकतींकरिता इलेव्हेशन / फसाडचे डिझाइन तयार करुन दिलेबाबत वास्तुविशारद श्री.महेंद्र चव्हाण व श्री.रवि कदम यांचे बैठकीमध्ये आभार मानण्यात आले. त्यानुसार संबंधितांना पत्र देणेबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या. | |
| ५ | विषय क्र.१ आठव्या बैठकीनंतर आजपर्यंत केलेल्या कार्यवाहीस मान्यता देणेबाबत. | समितीची सहावी बैठक विषय क्र. ६- महाबळेश्वर नगर परिषद हद्दीतील डॉ.साबणे रोड बाजार ग्रेड-३ या वरील मिळकतींचा सर्वेक्षण अहवाल तसेच बांधकाम परवानगी बाबत. | वर अ.क्र.४ मध्ये नमूद नुसार | संबंधित व पाठपुरावा सदस्य सचिव |
| ६ | विषय क्र.१ आठव्या बैठकीनंतर आजपर्यंत केलेल्या कार्यवाहीस मान्यता देणेबाबत. | महाबळेश्वर येथील सि.स.नं. १३३ व खाईस्ट चर्च येथील अनधिकृत बांधकामावर कार्यवाही करणेबाबत. | सि.स.नं. १३३ व खाईस्ट चर्च या हेरिटेज ग्रेड – I या जागेवर झालेल्या अनधिकृत बांधकामाबाबत मा.उच्च न्यायालयात दाखल रिट पिटीशन क्र. ५३९६/२०१८ मध्ये दि.०४/०५/२०१८ रोजीच्या आदेशान्वये मा.उच्च न्यायालयाने फेटाळले आहे, तसेच मनाई हुकुमाचा अर्ज फेटाळला आहे. त्यामुळे मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार सदर अनधिकृत बांधकामाबाबत यथोचित कार्यवाही करणेबाबत मा.अध्यक्षांनी मुख्याधिकारी, महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषद यांना सूचना दिल्या. | मुख्याधिकारी, महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषद |
| ७ | विषय क्र.२ | सातारा नगरपरिषद हद्दीतील वारसास्थळांची अंतिम यादी तयार करताना वगळलेल्या स्थळांवाबत कारण मिमांसेसह उप समितीने दि.०५/१०/२०१८ रोजी केलेल्या जागा | सातारा नगरपरिषद हद्दीतील एकूण १४९ वारसा स्थळांमधील वगळलेल्या १११ मिळकतींपैकी ३० मिळकती हेरिटेज यादीमध्ये अंतर्भूत करणेबाबतचा प्रस्तावाबाबत पुर्व बैठकीत निर्णय झाल्यानुसार वारसा स्थळ संवर्धन वास्तुविशारद (Conservation Architect) श्रीमती वैशाली लाटकर व श्री.चेतन सहस्त्रबुध्दे, सदस्य सचिव यांच्या उपसमितीने नगररचनाकार, सातारा नगरपरिषद यांच्या उपस्थितीत | मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद, सातारा |



Scanned by CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | पाहणीच्या अनुषंगाने सादरीकरण. | या ३० मिळकतींची संयुक्त पाहणी करुन तयार केलेला अहवाल बैठकीमध्ये सादर करण्यात आला. त्यावर सविस्तर चर्चा होवून सदर अहवालास बैठकीमध्ये मान्यता देण्यात आली. | |
| ८ | विषय क्र.३ | महाबळेश्वर येथील महाबळेश्वर क्लब या जागेतील काही जुन्या इमारती पाडून त्याच ठिकाणी नवीन इमारतीच्या बांधकामाबाबत. | महाबळेश्वर क्लब या मिळकतीची सन १९८९ साली दिलेली शेवटची बांधकाम परवानगी कार्यालयाच्या अभिलेखात उपलब्ध असल्याचे माहिती मुख्याधिकारी, महाबळेश्वर गिरिस्थान नगर परिषद यांनी दिली. यावर सविस्तर चर्चा होवून यापूर्वीची दि.०७/१२/२०१६ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्तात नमूद केल्यानुसार सदर जुन्या इमारती अधिकृत आहेत अगर कसे, याबाबत मंजुर बांधकाम नकाशे, सिटी सर्व्हे शिटस् व पुर्व विकास योजनेचा विद्यमान जमीन वापर नकाशा इ. आधारे तपासणी करणे आवश्यक आहे. सर्व विद्यमान इमारतींच्या अधिकृततेबाबत तपासणी केल्यानंतर ज्या विद्यमान इमारती मूळ मंजुर नकाशावर/ सिटी सर्व्हे शिटवर / पुर्व विकास योजनेच्या विद्यमान जमीन वापर नकाशा इत्यांदीवर नसतील तर त्या इमारती निष्कासित करणेसंबंधाने विहित कार्यवाही मुख्याधिकारी, महाबळेश्वर गिरीस्थान नगर परिषद यांनी करणे आवश्यक आहे. याबाबतचा अहवाल मुख्याधिकारी, महाबळेश्वर गिरीस्थान नगर परिषद यांनी पुढील बैठकीच्या वेळी सादर करणेबाबत मा. अध्यक्ष यांनी सूचना दिल्या. | मुख्याधिकारी, महाबळेश्वर गिरिस्थान नगर परिषद |
| ९ | विषय क्र.४ | **नगर परिषदांकडुन प्राप्त प्रस्तावावर चर्चा.**<br>**अ) वाई नगरपरिषद:-**<br>i) वाई नगरपरिषद हद्दीतील वारसा स्थळे वगळणेबाबत मा.संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे दाखल कलम ४७ खालील अपिलाबाबत. | वाई नगरपरिषद हद्दीतील हेरिटेज यादीतील अंतिम केलेल्या १०७ मिळकतींपैकी १४ मिळकतधारकांनी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ४७ अन्वये मा.संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे एकूण १४ अपील दाखल होती, याबाबत मा.संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी उक्त अधिनियमाचे कलम ४७ अन्वये निर्णय दिले आहेत, त्यानुसार एकूण १३ अपील फेटाळण्यात आली असून एक अपील अंशत: मान्य करण्यात आले आहे. सदर मिळकतीबाबतची यादी समितीच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आली असल्याची माहिती सदस्य सचिव यांनी दिली. त्यानुषंगाने चर्चा होवून वाई नगरपरिषद हद्दीतील हेरिटेज मिळकतींची यादी अंतिम झाली असल्याचे अध्यक्ष यांनी नमुद केले. | मुख्याधिकारी, वाई नगरपरिषद, वाई |
| १० | विषय क्र.४ | ii) वाई नगर परिषद हद्दीमध्ये सि.स.नं.५१-१, २, ३ पेठ गंगापूरी ग्रेड - I या हेरिटेज मिळकती मधील नवीन इमारतीच्या बांधकाम परवानगीबाबत. | वाई नगर परिषद हद्दीमध्ये सि.स.नं.५१-१, २, ३ पेठ गंगापूरी ग्रेड - I या हेरिटेज मिळकतीमधील नवीन इमारतीच्या बांधकाम परवानगीबाबत निर्णय घेणेकामी प्रस्ताव समितीपुढे सादर करण्यात आला. परंतु सदर मिळकती हेरिटेज ग्रेड-I मध्ये समाविष्ठ असल्याने वाई नगरपरिषदेसाठी लागू असलेल्या हेरिटेज नियमावलीतील तरतुदीनुसार ग्रेड-I मध्ये कोणतेही नविन बांधकाम अनुज्ञेय नाही. त्यामुळे सदर प्रस्ताव नामंजूर करणेबाबतचा निर्णय समितीने घेतला व याबाबत स्वतंत्र आदेश पारित करणेबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या. | सदस्य सचिव |



Scanned by CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११ | विषय क्र.४ | ब)महाबळेश्वर नगरपरिषद:-<br>i) महाबळेश्वर येथील सि.स.नं. २०२ अ शिंदोळा पार्क ग्रेड-I या हेरिटेज मिळकतीस दुरुस्तीसह हेरिटेज हॉटेलसाठी परवानगी मिळणेबाबत - उमाराजे गंगाधरराव उर्फ बाळासाहेब पटवर्धन व एक यांचा प्रस्ताव. | महाबळेश्वर येथील सि.स.नं. २०२ अ शिंदोळा पार्क ही मिळकत हेरिटेज ग्रेड-I आहे. विषयांकित जागेवरील विद्यमान इमारतींना दुरुस्तीसह हेरिटेज हॉटेलसाठी परवानगी मिळणेबाबत अर्ज उमाराजे गंगाधरराव उर्फ बाळासाहेब पटवर्धन व एक यांनी सादर केला असल्याची माहिती सदस्य सचिव यांनी समितीस दिली. मागील बैठकीत ठरले प्रमाणे सदर मिळकतीची पाहणी सदस्यां समवेत करण्यात आली. यानंतर बैठकीमध्ये या विषयाबाबतचे सादरीकरण अर्जदारांच्या वतीने वास्तुविशारद श्री.महेंद्र चव्हाण यांनी केले. सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा होवून महाबळेश्वर शहराच्या सिटी सर्व्हे शिटवर ज्या इमारती आहेत. केवळ त्याच इमारतींना दुरुस्ती परवानगी तसेच ज्या इमारती पडल्या आहेत, अशा इमारतींचे सिटी सर्व्हे शिटप्रमाणे पुनर्बांधणी परवानगी देणेबाबत सर्वानुमते बैठकीत ठरले. तसेच अर्जदार यांनी हेरिटेज हॉटेलसाठी परवानगी अपेक्षिली असुन, प्रथमत रहिवास या वापरासाठी दुरुस्ती / पुनर्बांधणी देणेबाबत निर्णय घेण्यात आला. पुनर्बांधणी संदर्भात श्रीमती वैशाली लाटकर, सदस्य यांनी खालीलप्रमाणे सुचविलेल्या मार्गदर्शनपर सूचनांप्रमाणे कार्यवाही करणे व त्यासापेक्ष बांधकाम परवानगी देणेसंदर्भाने सविस्तर आदेश तयार करणेबाबत मा.अध्यक्ष यांनी सुचना सदस्य सचिव यांना दिल्या.<br>i) Structural repairs by appropriate scientific approved methods.<br>ii) Finishes as per original finishes in terms of materials and technics.<br>iii) Restoration to original form by removing in appropriate inappropriate later additions & alterations.<br>iv) Does not include addition of any sort in the interior or to exteroir of the structures.<br>v) Detailed documentation of existing structures to be submitted prior to any intervention. | सदस्य सचिव |
| १२ | विषय क्र.४ | ii) महाबळेश्वर येथील सि.स.नं.७९ व ७९अ, सेक्टर-२ क्लेअर व्हिला ग्रेड-II या हेरिटेज मिळकतीस बांधकाम परवानगीबाबत. | सि.स.नं.७९ व ७९अ, सेक्टर-२ क्लेअर व्हिला ग्रेड-II या हेरिटेज मिळकतीचा दूरूस्ती व पुर्नबांधकामाचा प्रस्ताव अर्जदार श्री सावला यांनी सादर केला असल्याची माहिती सदस्य सचिव यांनी दिली. सदर जागेची पाहणी बैठकीपुर्वी करण्यात आली. बैठकीमध्ये या विषयाबाबतचे सादरीकरण वास्तुविशारद श्री विठ्ठल सुतार यांनी केले. या जागेवरील पुनर्बांधकामाच्या प्रस्तावास तत्कालीन वारसा स्थळ जतन समितीने दि.२३/१०/२०१० च्या बैठकीत मान्यता दिली असुन, त्यानुसार महाबळेश्वर नगरपरिषदेकडुन परवानगी मिळाली नसलेचे नमुद करुन सदर बांधकामास तात्कालीन हेरिटेज कमिटीने मान्यता दिल्यानुसार प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत विनंती करण्यात आली. याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. सदर चर्चेवेळी हेरिटेज नियमावलीत बदल झाला असुन, बदललेल्या | सदस्य सचिव |



Scanned by CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | नियमावलीनुसार विकास करणे अभिप्रेत व आवश्यक असल्याची चर्चा यावेळी झाली. सदर मिळकत हेरिटेज ग्रेड-IIA मिळकतीमध्ये नविन बांधकाम अनुज्ञेय नाही, केवळ विद्यमान इमारतींना दुरुस्ती अनुज्ञेय असल्याने, त्यानुसार महाबळेश्वर शहराच्या सिटी सर्व्हे शिटवर ज्या इमारती आहेत, केवळ त्याच इमारतींना दुरुस्ती परवानगी तसेच ज्या इमारती पडल्या आहेत, अशा इमारतींचे सिटी सर्व्हे शिटप्रमाणे पुनर्बांधणी परवानगी देणेबाबत सर्वानुमते बैठकीत ठरले. पुनर्बांधणी संदर्भात श्रीमती वैशाली लाटकर, सदस्य यांनी खालीलप्रमाणे सुचविलेल्या मार्गदर्शनपर सूचनांप्रमाणे कार्यवाही करणे व त्यासापेक्ष बांधकाम परवानगी देणेसंदर्भाने सविस्तर आदेश तयार करणेबाबत मा.अध्यक्ष यांनी सुचना सदस्य सचिव यांना दिल्या.<br>i) Structural repairs by appropriate scientific approved methods.<br>ii) Finishes as per original finishes in terms of materials and technics.<br>iii) Restoration to original form by removing in appropriate inappropriate later additions & alterations.<br>iv) Does not include addition of any sort in the interior or to exteroir of the structures.<br>v) Detailed documentation of existing structures to be submitted prior to any intervention. | |
| १३ | **विषय क्र.४** | iii) महाबळेश्वर येथील वेण्णा लेक विकास- मुख्याधिकारी, महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषद यांचा प्रस्ताव. | महाबळेश्वर गिरीस्थान नगर परिषद हद्दीतील वेण्णा लेक परिसराचा विकास करणेबाबतचा प्रस्ताव मुख्याधिकारी, महाबळेश्वर गिरीस्थान नगर परिषद यांनी सादर केला असल्याची माहिती सदस्य सचिव यांनी समितीस दिली. या विषयाबाबतचे सादरीकरण वास्तुविशारद श्रीमती वंदना लब्बा यांनी केले. सदरचा प्रस्ताव राष्ट्रीय लेक संवर्धन योजनेअंतर्गत हाती घेणेत येणार असल्याची माहिती मुख्याधिकारी यांनी दिली. यावेळी मा.अध्यक्षांनी या विषयाबाबत यापूर्वीचे दि.०५/१०/२०१६ रोजीच्या बैठकीत चर्चा झाली असुन, सदर बैठकीत वेण्णा लेक संवर्धन योजनेस प्राथमिक मान्यता यापूर्वीच दिले असून वेण्णा लेक संवर्धनाबाबतचा प्रारुप आराखडा (DPR) तयार करुन तो अंतिम मंजूरीसाठी हेरिटेज कमिटीसमोर सादर करण्याबाबतचा निर्णय यापूर्वीच झाला असल्याचे नमूद केले.<br>यावेळी उप वन संरक्षक यांचे प्रतिनिधी यांनी वेण्णा लेक तलावाची जागा मूळ वन विभागाची असून वन विभागाने सदर जागा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे हस्तांतरण केली असल्याची माहिती दिली. या अनुषंगाने सविस्तर चर्चा होवून सदर प्रस्तावाखालील जागेची संयुक्त पाहणी वन विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व नगरपरिषद यांनी एकत्रित करुन सदर प्रस्तावास सर्व संबंधीत विभागाची पूर्व मान्यता घेणे आवश्यक असल्याचे बैठकीत ठरले. त्यानुसार पुढील कार्यवाही | मुख्याधिकारी, महाबळेश्वर गिरिस्थान नगर परिषद |



Scanned by CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | करण्याच्या सूचना मा.अध्यक्षांनी मुख्याधिकारी, महाबळेश्वर यांना दिल्या. | |
| १४ | विषय क्र.४ | iv) महाबळेश्वर नगरपरिषद हद्दीतील सि.स.नं.१९७, माऊंट माल्कम ही मिळकत हेरिटेज यादीमधुन वगळणेबाबत. | सि.स.नं.१९७, माऊंट माल्कम ही मिळकत हेरिटेज ग्रेड-IIA आहे. सदर मिळकत हेरिटेज यादीमधुन वगळणे अथवा ग्रेड-IIA वरुन ग्रेड-III करणेबाबत अर्जदार मेकवेव्हज सी रिसॉर्ट मुंबई यांनी समितीच्या नांवे दि.१६/०८/२०१८ रोजी अर्ज दाखल केला असुन, सदर अर्जावर नियोजन प्राधिकरण महाबळेश्वर नगरपरिषदेचे अभिप्राय दि.२७/०९/२०१८ चे पत्र क्र.३११७ अन्वये अपेक्षिले आहेत, तथापि, त्यांचेकडील अभिप्राय प्राप्त झाले नसल्याची माहिती सदस्य सचिव यांनी सभेस दिली. अर्जदार कंपनीने सादर केलेला अर्ज बैठकीत ठेवण्यात आला. यावेळी महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषदेच्या मंजुर हेरिटेज नियमावलीचे अवलोकन केले असता, महाबळेश्वर नगरपरिषदेच्या मंजूर हेरिटेज नियमावलीतील विनियम क्र.४.१ ते ४.३ नुसार मुख्याधिकारी यांनी वारसा स्थळ जतन समितीच्या मान्यतेने कार्यवाही करणे अपेक्षित आहे. तत्पुर्वी सादर केलेल्या अर्जावर मुख्याधिकारी, महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषद यांनी तपासणी करुन सदर प्रस्ताव समितीच्या पुढील बैठकीत सादर करण्याच्या सूचना मा.अध्यक्ष यांनी दिल्या. | मुख्याधिकारी, महाबळेश्वर गिरिस्थान नगर परिषद व सदस्य सचिव |
| १५ | विषय क्र.४ | **क) पांचगणी नगरपरिषद:-** पांचगणी नगरपरिषद हद्दीतील नगर रचना योजना क्र. ३, अं.भू.क्र. १७०, डॉ. सावंत मार्केट विकसित करणे या प्रस्तावावर पुर्नविचार करणे - मुख्याधिकारी, पांचगणी गिरिस्थान नगरपरिषद यांचा प्रस्ताव. | पांचगणी नगरपरिषद हद्दीतील नगर रचना योजना क्र. ३, अं.भू.क्र. १७०, डॉ. सावंत मार्केट विकसित करणे या प्रस्तावाच्या अनुषंगाने वारसा स्थळ जतन समिती मार्फत दि.२६/१०/२०१८ रोजी सकाळचे सत्रामध्ये समक्ष जागा पहाणी करण्यात आली. त्याठिकाणी प्रस्तावाबाबत नियोजित बांधकामाच्या अनुषंगाने आर्किटेक्ट श्री.रवी कदम यांनी समितीस सविस्तर माहिती दिली. त्यावेळी नियोजित माहितीमध्ये आवश्यकतेनुसार वाहनतळ प्रस्तावित करणे व त्याठिकाणी केवळ दुचाकी वाहनांकरिता वाहनतळ अनुज्ञेय करणेसापेक्ष प्रस्तुत प्रस्तावास मान्यता देण्यात आली. त्यानुसार आदेश तयार करण्याच्या सूचना मा.अध्यक्ष यांनी दिल्या. | सदस्य सचिव |
| १६ | विषय क्र.४ | **ड) सातारा नगरपरिषद :-** सातारा नगर परिषद हद्दीतील जिल्हा परिषदे चे प्रतापसिंह हायस्कुल, सातारा येथील हेरिटेज इमारतीच्या दुरुस्तीबाबत - कार्यकारी अभियंता, सातारा जिल्हा परिषद, बांधकाम विभाग, उत्तर, सातारा यांचा प्रस्ताव. | वरील अ.क्र.३ प्रमाणे. | सदस्य सचिव / कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, सातारा |

Scanned by CamScanner

मा.अध्यक्ष यांच्या परवानगीने उपस्थितांचे आभार मानुन बैठक संपल्याचे सदस्य सचिव यांनी जाहीर केले .

सही/-
**वि.ल.वाघमोडे**
सदस्य सचिव,
वारसा स्थळ जतन समिती,
तथा
सहायक संचालक, नगर रचना, सातारा

सही/-
**दिलीप बंड** I.A.S. (Retd)
अध्यक्ष,
वारसा स्थळ जतन समिती,
महाबळेश्वर, पांचगणी, वाई, सातारा नगर परिषद
व महाबळेश्वर-पांचगणी प्रदेश

---

जिल्हा परिषद विस्तारीत इमारत,
पहिला मजला, सातारा.
दुरध्वनी क्र.०२१६२/२३९२४१.
जा.क्र.वा.स.ज.स./बै.क्र.९/इतिवृत
/ससंसा/ ३६४८
दिनांक २० /११/२०१८

प्रति,

-------------------------
-------------------------
-------------------------

२/- वारसा स्थळ जतन समितीचे दि.२६/१०/२०१८ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत माहितीसाठी व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी.

20/11/2018
( वि.ल.वाघमोडे )
सदस्य सचिव,
वारसा स्थळ जतन समिती,
तथा
सहायक संचालक, नगर रचना,
सातारा

Scanned by CamScanner

"सातारा, वाई, पांचगणी व महाबळेश्वर नगर परिषद तसेच प्रादेशिक योजना, महाबळेश्वर पांचगणी क्षेत्र" या करिता

**वारसा स्थळ जतन समिती**

---

**कॉन्फरन्स हॉल, हिरडा वनविश्रामगृह, महाबळेश्वर येथे दि.१३/०९/२०१९ रोजी दुपारी ३ वाजता संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्त**

"सातारा, वाई, पांचगणी व महाबळेश्वर नगर परिषद तसेच प्रादेशिक योजना, महाबळेश्वर पांचगणी क्षेत्र" या करिता वारसा स्थळ जतन समितीची अकरावी बैठक मा. दिलीप बंड, I.A.S. (Retired) यांच्या अध्यक्षतेखाली दि. १३/०९/२०१९ रोजी दुपारी ३ वाजता कॉन्फरन्स हॉल, हिरडा वन विश्रामगृह, महाबळेश्वर येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस वारसा स्थळ जतन समितीचे बैठकीस खालील सन्माननिय सदस्य व निमंत्रित सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्य | पद |
|---|---|---|
| १ | मा. दिलीप बंड, I.A.S. (Retired) | अध्यक्ष |
| २ | मा. जिल्हाधिकारी, सातारा यांचेतर्फे श्रीमती संगिता राजापूरकर-चौगुले (उप विभागीय अधिकारी, वाई उप विभाग,वाई) | सदस्य |
| ३ | मा.श्री.अविनाश पाटील, सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे. | सदस्य |
| ४ | मा.श्री.रवी रानडे, स्ट्रक्चरल इंजिनिअर | सदस्य |
| ५ | मा.डॉ. श्री. जय शा. सामंत, पर्यावरण तज्ञ | सदस्य |
| ६ | मा.डॉ. श्री.शिवाजीराव चव्हाण, इतिहास तज्ञ | सदस्य |
| ७ | मा.श्री.चेतन सहस्त्रबुध्दे, कॉन्झर्वेशन आर्कीटेक्ट | सदस्य |
| ८ | श्री. वि.ल.वाघमोडे, सहायक संचालक, नगर रचना, सातारा | सदस्य सचिव |
| ९ | मा. उप वन संरक्षक, सातारा यांचेवतीने श्री रणजित गायकवाड, वन क्षेत्रपाल, महाबळेश्वर | विशेष निमंत्रक |
| १० | श्री. शंकर गोरे, मुख्याधिकारी, सातारा नगर परिषद, सातारा | विशेष निमंत्रक |
| ११ | मुख्याधिकारी, महाबळेश्वर गिरीस्थान नगर परिषद तर्फे श्री.जोशी, प्रतिनिधी | विशेष निमंत्रक |
| १२ | मुख्याधिकारी, पाचगणी गिरीस्थान नगर परिषद तर्फे श्री.रवी कांबळे. प्रतिनिधी | विशेष निमंत्रक |
| १३ | श्रीमती विद्या पोळ, मुख्याधिकारी, वाई नगर परिषद, वाई | विशेष निमंत्रक |
| १४ | श्री.अनिल पाटील, नगर रचनाकार, सातारा नगरपरिषद, | |

सहायक संचालक, नगर रचना, सातारा तथा सदस्य सचिव, वारसा स्थळ जतन समिती यांनी मा. अध्यक्ष व मा. सदस्य, विशेष निमंत्रक तसेच उपस्थितांचे स्वागत करुन मा. अध्यक्षांच्या अनुमतीने आवश्यक गणपुर्ततेच्या खातरजमेअंती बैठकीचे कामकाज सुरु केले. खालील विषयी विषयनिहाय सादरीकरण व चर्चा होऊन पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

| अ.क्र | विषय | | चर्चा / निर्णय | अपेक्षित कार्यवाही यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | ४ |
| १ | **विषय क्र.१** | वारसा स्थळ जतन समितीची दि.०७/०६/२०१९ रोजी संपन्न झालेल्या दहाव्या बैठकीचे इतिवृत्त कायम करणे व दहाव्या बैठकीनंतर आजपर्यंत केलेल्या कार्यवाहीस मान्यता देणेबाबत. | वारसास्थळ जतन समितीच्या दि.०७/०६/२०१९ रोजी संपन्न झालेल्या दहाव्या बैठकीचे इतिवृत्ताबाबत कोणाचीही हरकत प्राप्त झाली नसलेने बैठकीचे इतिवृत्त कायम करण्याची विनंती सदस्य सचिव यांनी केली, त्यास सर्व सदस्यांच्या सहमतीने मा.अध्यक्ष यांनी मान्यता दिली. | ---- |
| | | <u>समितीची पाचवी बैठक विषय क्र. २ -</u> सातारा शहरातील जुना व नवा राजवाडा या ऐतिहासिक वास्तुंची दखल घेणेबाबत मा.श्री. शिवेंद्रसिंहराजे भोसले (विधानसभा सदस्य) यांचे अर्जावर विचार करणे. | नवा राजवाडा हा राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यात असून त्याचे दुरुस्तीबाबत शासनाकडे पत्रव्यवहार झाला असल्याने याबाबतचा तपशिल उपलब्ध करुन घेवुन त्यानुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत शासनाकडे समक्ष व पत्रव्यवहाराच्या माध्यमातून पाठपुरावा करणेबाबत मागील बैठकीमध्ये ठरले होते. तथापि, नवा राजवाडा दुरुस्ती प्रस्तावाबाबत संबंधित राज्य शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे समक्ष संपर्क साधला असता, त्यांच्याकडून अशा प्रकारचा प्रस्ताव / पत्र व्यवहार शासनाकडे सादर झाला नसल्याचे सांगण्यात आले असलेची माहिती सदस्य सचिव यांनी समितीस दिली.<br><br>मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद श्री.शंकर गोरे यांनी मा.श्रीमंत छत्रपती कल्पनाराजे यांनी, मा.महसुल मंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना पाठविलेले पत्रांच्या अनुषंगाने निवासी जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा यांनी जुना राजवाडा मध्ये सुरु असलेली सातारा नगरपरिषदेची / जिल्हा परिषद, सातारा यांची शाळा अन्यत्र हलविणेबाबत नगरपरिषद / जिल्हा परिषद, सातारा कडील अहवाल अपेक्षिला असल्याची माहिती दिली.<br><br>जुना राजवाड्याचा काही भाग सातारा जिल्हा परिषद तसेच काही भाग सातारा नगरपरिषदेच्या ताब्यात असुन, नवा राजवाडा शासन, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यात आहे. या दोन्ही राजवाड्याच्या मालकीबाबतचा मुद्दा मा.सदस्य, डॉ. शिवाजीराव चव्हाण यांनी उपस्थित केला तसेच या दोन्ही राजवाडयांच्या मालकी हक्कासंदर्भाने यापूर्वी काही पत्रव्यवहार झाला होता. निवासी उपजिल्हाधिकारी यांनी याविषयाची माहिती पुर्वी समितीसमोर दिली होती व राजवाडा हा पुर्णपणे शासकिय मालकीचा आहे, याबाबतची माहिती बैठकीवेळी सर्व समिती सदस्यांना अवगत केली होती. प्रस्तुतच्या बैठकीस समिती सदस्य, डॉ.शिवाजीराव चव्हाण हे उपस्थित होते. मात्र, | मा.अध्यक्ष / सदस्य सचिव व मुख्याधिकारी, सातारा नगर परिषद, सातारा |

| | | |
|---|---|---|
| | सातारा नगर परिषदेस प्राप्त उक्त नमुद पत्रास अनुसरुन मा.अध्यक्ष यांनी या दोन्ही राजवाड्यांच्या मालकी हक्काबाबत सातारा नगर परिषदेने व महसूल विभागाने पुन:श्च एकदा तपासणी करण्याच्या सुचना दिल्या.<br><br>दोन्ही राजवाडयाचे जतन / संवर्धनासाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव मा.अध्यक्ष, वारसा स्थळ जतन समिती यांच्या स्वाक्षरीने शासनास सादर करणेच्या सूचना मा.अध्यक्ष यांनी सदस्य सचिव यांना दिल्या. | |
| समितीची पाचवी बैठक विषय क्र. ५-<br>पांचगणी नगर परिषद हद्दीतील मार्केट या रस्त्यावरील मिळकतींचा सर्वेक्षण अहवाल समिती समोर सादर करणेबाबत. | पांचगणी गिरीस्थान नगरपरिषद हद्दीतील बाजार ग्रेड - I व महाबळेश्वर गिरिस्थान नगर परिषद हद्दीतील बाजार ग्रेड-III सन्मुख मिळकतींमधील सर्व इमारतींचे फसाड/इलेव्हेशन एकसारखे राहण्याच्या दृष्टीकोनातून या रस्त्यावरील मिळकती सन्मुखच्या इमारतींचे इलेव्हेशन / फसाड बाबत मा.सदस्य श्री.सहस्त्रबुध्दे यांनी तयार केलेल्या पर्यायांबाबत चर्चा करुन अंतिम निर्णय घेणेबाबत मागील बैठकीत निर्णय झाला होता. समितीत झालेल्या निर्णयानुसार मा.सदस्य श्री.सहस्त्रबुध्दे यांनी पांचगणी व महाबळेश्वर नगर परिषद हद्दीतील बाजार या हेरिटेज मिळकती सन्मुखच्या इमारतींचे इलेव्हेशन / फसाड बाबत तयार केले असलेची माहिती दिली. तथापि, सदर माहिती सॉफ्ट स्वरुपात उपलब्ध झाली नसलेने, याबाबत चर्चा झाली नाही. याबाबत पुढील बैठकीत निर्णय घेण्याचे सर्वानुतमे ठरले. | श्री. सहस्त्रबुध्दे / सदस्य सचिव |
| समितीची सहावी बैठक विषय क्र. ६- महाबळेश्वर नगर परिषद हद्दीतील डॉ.साबणे रोड बाजार ग्रेड-३ या वरील मिळकतींचा सर्वेक्षण अहवाल तसेच बांधकाम परवानगी बाबत. | महाबळेश्वर गिरीस्थान नगर परिषद हद्दीतील डॉ.साबणे रोड या हेरिटेज मिळकतीसन्मुख इमारतींचे फसाड / इलेव्हेशनबाबत निर्णय पुढील बैठकीत होणे आवश्यक आहे. डॉ. साबणे रोड या रस्त्यावरील ४ फुट अंतरात नगर परिषदेस झाडे लावण्याचा हक्क असल्याचे मिळकत पत्रिका उता-यावर नमुद आहे तसेच विकास योजना, महाबळेश्वर (दू.सु.) नकाशावर इमारत रेषा दर्शविली आहे. तथापि, या रस्त्याच्या सन्मुख दोन्ही बाजूस अतिक्रमण झाले असुन सदर अनधिकृत बांधकाम काढुन टाकणेचा विषय खुप दिवसांपासून प्रलंबित असल्याचे तसेच मुख्याधिकारी, महाबळेश्वर नगर परिषद यांनी याबाबत कोणतीही कार्यवाही केली नसल्याबाबत दिसून आल्याने मा.अध्यक्ष यांनी नाराजी व्यक्त करुन अशा रस्त्यासन्मुख सर्व अनधिकृत बांधकामांना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ५२, ५३ व तदनुषंगीक इतर कलमांन्वयेच्या तदतूदींनुसार नोटीस देण्यात येऊन विधानसभा निवडणुकीनंतर अतिक्रमण काढणेच्या सूचना मा.अध्यक्ष यांनी मुख्याधिकारी, महाबळेश्वर | मुख्याधिकारी, महाबळेश्वर नगर परिषद. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | गिरीस्थान नगर परिषद, महाबळेश्वर यांना मागील बैठकीत दिल्या होत्या. याबाबत महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषदेने अद्याप काहीही कार्यवाही केली नसलेची माहिती सदस्य सचिव यांनी समितीस दिली.<br><br>याबाबत चर्चा होऊन मा.अध्यक्ष यांनी वर नमुद केलेली कार्यवाही निवडणुकीनंतर १५ दिवसांत पूर्ण करावी, अशा सूचना महाबळेश्वर नगरपरिषदेच्या प्रतिनिधींना दिल्या. | |
| | | महाबळेश्वर येथील वेण्णा लेक विकास मुख्याधिकारी, महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषद यांचा प्रस्ताव. | महाबळेश्वर गिरीस्थान नगर परिषद हद्दीतील वेण्णा लेक परिसराचा विकास करणेबाबतचा प्रस्ताव मुख्याधिकारी, महाबळेश्वर गिरीस्थान नगर परिषद यांनी सादर केला असल्याची माहिती सदस्य सचिव यांनी समितीस दिली. मागील बैठकीत या अनुषंगाने सविस्तर चर्चा होवून सदर प्रस्तावाखालील जागेची संयुक्त पाहणी वन विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व महाबळेश्वर नगरपरिषद यांनी एकत्रित करुन सदर प्रस्तावास सर्व संबंधीत विभागाची पूर्व मान्यता घेणे आवश्यक असल्याचे मागील बैठकीत ठरले होते. पर्यावरणाच्या दृष्टीने सदर प्रकल्प अत्यंत महत्वाचा असल्याने मा.जिल्हाधिकारी, सातारा यांनी वन विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व नगर परिषद यांची एकत्रित बैठक घेऊन याबाबतचा निर्णय १ महिन्याच्या आत घेणेबाबत सूचना मा.अध्यक्षांनी मुख्याधिकारी, महाबळेश्वर यांना दिल्या होत्या. तथापि, सदर प्रकरणी अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याचे सदस्य सचिव यांनी नमुद केले.<br><br>वेण्णा लेक संवर्धनाचा प्रकल्प हा राष्ट्रीय लेक संवर्धन अंतर्गत केंद्र शासनाचा प्रकल्प असलेने, सदर प्रकल्पाबाबत योग्य ती कार्यवाही करुन सदर प्रकल्प सर्व विभागाच्या मान्यतेनंतर त्वरीत सादर करणे आवश्यक असलेचे मा.सदस्य डॉ.जय सामंत यांनी नमुद केले.<br><br>मागील बैठकीत निर्णय होऊन देखील अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नसुन, या प्रकल्पासाठी चार विभागाकडील अधिकारी यांचा एकमेकांशी समन्वय होत नाही व महाबळेश्वर नगर परिषद अशा समन्वयानुषंगाने योग्य तो पाठपूरावा करत नाही, अशी नाराजी मा.सदस्य, सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे श्री अविनाश पाटील यांनी व्यक्त केली.<br><br>याबाबत सविस्तर चर्चा होऊन जिल्हाधिकारी, सातारा यांनी बैठक घेऊन, उप वनसंरक्षक, जीवन प्राधिकरणाचे वरिष्ठ अधिकारी | मा.सदस्य तथा जिल्हाधिकारी सातारा / उपविभागीय अधिकारी, वाई उपविभाग, वाई. / मा.उप वनसंरक्षक, सातारा / मुख्याधिकारी, महाबळेश्वर गिरिस्थान नगर परिषद. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | व मुख्याधिकारी, महाबळेश्वर नगर परिषद यांची एकत्रित बैठक घेऊन वेण्णा लेक परिसराचा विकास करणेबाबतचा निर्णय १ महिन्याच्या आत घ्यावा, असा निर्णय सर्वानुमते झाला. याबाबतचा सविस्तर पाठपुरावा महाबळेश्वर नगर परिषद यांनी करणेच्या सूचना मा.अध्यक्षांनी दिल्या. | |
| २ | **विषय क्र.२** | सातारा नगरपरिषद हद्दीतील वारसास्थळांची अंतिम यादी तयार करतांना वगळलेल्या १११ स्थळांपैकी ३० स्थळांचा पुन:श्च यादीमध्ये समावेश करण्याच्या अनुषंगाने मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद, सातारा यांनी केलेल्या कार्यवाहीचे सादरीकरण. | सातारा नगर परिषद हद्दीतील एकुण १४९ वारसा स्थळांमधील वगळलेल्या १११ मिळकतींपैकी २७ मिळकती हेरिटेज यादीमध्ये अंतर्भुत करणेबाबत दि.२६/१०/२०१८ रोजीच्या बैठकीत निर्णय होऊन विनियमानुसार पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना मा.अध्यक्ष, यांनी मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद यांना दिल्या असलेने, याबाबतची माहिती मुख्याधिकारी यांनी देणेबाबत सदस्य सचिव यांनी दिली.<br><br>सदर प्रकरणी श्री. शंकर गोरे मुख्याधिकारी, सातारा नगर परिषद, सातारा व श्री.अनिल पाटील, नगर रचनाकार, सातारा नगर परिषद यांनी, या सर्व मिळकत धारकांना वैयक्तिक नोटीसा दिल्या असुन, सातारा नगरपरिषदेकडे १९ हरकती प्राप्त झाल्या असुन, या सर्व मिळकतधारकांना वैयक्तिक सुनावणी देऊन यादी अंतिम करणार असलेची माहिती दिली.<br><br>या २७ मिळकतीपैंकी सातारा नगर परिषदेने काही मिळकती वगळावयाचा निर्णय निर्णय घेतला तर याबाबत सविस्तर स्पष्टीकरण / खुलासा समितीपूढे सादर करणे आवश्यक असलेचे मत मा.सदस्य, डॉ.जय सामंत यांनी व्यक्त केले.<br><br>यावर सविस्तर चर्चा होऊन मा.अध्यक्ष यांनी सदर कार्यवाही पुढील बैठकीपूर्वी करुन कार्यपूर्ती अहवाल सादर करणेबाबत सूचना दिल्या. | मुख्याधिकारी, सातारा नगर परिषद, सातारा. |
| ३ | **विषय क्र.३** | सातारा जिल्हयातील सातारा, वाई, महाबळेश्वर, पांचगणी नगरपरिषद आणि महाबळेश्वर - पांचगणी प्रदेश यांच्या मंजूर वारसा स्थळ जतन नियमावलींमध्ये एकसुत्रता आणणेबाबत तयार करण्यात आलेल्या नियमावलीवर चर्चा करुन एकच नियमावली अंतिम करणे. | सातारा जिल्हयातील सातारा, वाई, महाबळेश्वर, पांचगणी नगरपरिषद आणि महाबळेश्वर - पांचगणी प्रदेश यांच्या मंजूर वारसा स्थळ जतन नियमावलींमध्ये एकसुत्रता आणणेबाबत तयार करण्यात आलेल्या नियमावलीवर चर्चा करुन एकच नियमावली अंतिम करणे या अनुषंगाने मागील बैठकीत ठरल्यानुसार अंतिमरित्या तयार झालेल्या नियमावलीची प्रत सर्व सदस्यांना इमेलवर पाठविण्यात आली असता, मा.सदस्य श्री रवि रानडे यांनी उक्त नियमावलीतील विनियम क्र.१२ हेरिटेज फंड याबाबतचा विनियमात दुरुस्ती करणेबाबत ईमेलव्दारे विनंती केली होती. त्यानुसार मा.अध्यक्ष यांच्या मान्यतेने सदरचा | मा.सदस्य तथा सह संचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे / सदस्य सचिव. |

विनियमात दुरुस्ती करुन नियमावलीचा मसुदा तयार झाला असलेची माहिती सदस्य सचिव यांनी समितीस दिली.

हेरिटेज फंडाबाबत पुरातत्व विभाग व पर्यटन विभागाकडुन निधी उपलब्ध करुन घेणे आवश्यक आहे, असे मत सदस्य सचिव यांनी मांडले.

उक्त नियमावलीतील विनियम क्र.४.१- Preparation of List of Heritage Buildings, Heritage Precincts and Listed Natural Features या बाबतचा असुन त्यानुषंगाने मा.सदस्य, श्री चेतन सहस्त्रबुध्दे यांनी वारसा स्थळांची यादी तयार करताना, सदरचे वारसा स्थळ का समाविष्ट करण्यात आले, याबाबतची कारण मिमांसा, सदर वारसा स्थळाचे महत्व, वारसा स्थळांचा नकाशा, डिमार्केशन प्लॅन, नांव, वर्गीकरण इत्यादी माहिती नमूद करुन या अनुषंगाने प्रारुप नियमावलीत दुरुस्ती करणे आवश्यक असलेचे मत मांडले.

एखाद्या भागधारकांना (Stakeholders) वारसा स्थळांच्या यादीमध्ये नवीन वारसा स्थळ समाविष्ट करणेसाठी अर्ज दाखल करण्याचा विनियम अथवा तसेच यासाठी प्रमाणित मानके (Standard Format) मध्ये संबंधित भागधारकांनी (Stakeholders) माहिती चेकलिस्ट तयार करणे आवश्यक आहे, अशी सूचना मा.सदस्य, श्री.रवि रानडे यांनी मांडली.

वारसा स्थळांच्या यादी मध्ये परिसर (Precinet) अशी नोंद असते. यामुळे या वारसा स्थळाचा नेमका बोध होत नाही अथवा या स्थळाबाबत हद्दीचा नेमका अर्थ लावता येत नसलेने, याबाबत स्पष्टता होणे आवश्यक आहे, अशी सूचना मा.सदस्य, डॉ.जय सामंत यांनी मांडली.

उक्त नियमावलीतील विनियम क्र.१३ - Grading Development/ Design Control of the Listed Buildings / Listed Precincts या विनियमाच्या अनुषंगाने देखील अनुज्ञेय विकासाबाबत स्पष्टता नियमावलीत होणे आवश्यक असलेचे मत मा.सदस्य, श्री चेतन सहस्त्रबुध्दे यांनी मांडले.

या चर्चाच्या अनुषंगाने नियमावलीत समाविष्ठ करणेयोग्य मुद्यांच्या अनुषंगाने शब्दरचना (Wording) उपलब्ध करुन दिलेनंतर विनियमात दुरुस्ती करुन सदरची नियमावली

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | दुरुस्त करुन सर्वसमावेशक विकास नियंत्रण नियमावलीत अंतर्भुत करणेबाबत कार्यवाही करता येईल, असे मत मा.सदस्य, सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे यांनी मत मांडले.<br><br>या विषयांवर सविस्तर चर्चा होऊन, वर नमुद मुद्यांच्या अनुषंगाने सर्व सदस्यांनी नियमावलीत समाविष्ठ करणेयोग्य मुद्यांच्या अनुषंगाने शब्दरचना (Wording) मा.सदस्य, सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग,पुणे यांचेकडे ईमेल व्दारे पाठविणेबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या. | |
| ४ | **विषय क्र.४ व ५** | १) वारसा स्थळांच्या मंजूर यादीमध्ये अथवा वारसा स्थळांच्या श्रेणीमध्ये सुधारणा / बदल करणे बाबत तपासणी सूची अंतिम करणे.<br>२) विद्यमान वारसा स्थळांच्या परिसरामध्ये व वारसा स्थळांच्या इमारती मध्ये सुधारणा / बदल करणेबाबतची तपासणी सूची तयार करणे. | सातारा, वाई, महाबळेश्वर व पांचगणी नगर परिषद तसेच महाबळेश्वर-पांचगणी प्रादेशिक योजना क्षेत्रातील वारसा स्थळांच्या मंजूर यादीमध्ये अथवा वारसा स्थळांच्या सुधारणा / बदल करणेबाबतचा विषयाचे अनुषंगाने मा.समिती सदस्य श्री.रवी रानडे यांनी तयार केलेल्या एक्सेल शिटमध्ये गुणांकाचा तक्ता सर्व समिती सदस्यांना उपलब्ध करुन देणेत आला. याबाबत सविस्तर चर्चा होऊन सदरचे तक्ते नियमावलीचा भाग करणे आवश्यक असलेने, त्यानुसार परिशिष्ट विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमध्ये अंतर्भुत करता येईल, असे मत मा.सदस्य, सह संचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे यांनी मांडले. त्यानुसार प्रस्तुतची एकसेल सीट मधील माहिती pdf स्वरुपात नियमावलीमध्ये अंतर्भुत करणेसाठी मा.सदस्य, सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे यांनी प्रयत्न करणे बाबतच्या सूचना मा.अध्यक्ष यांनी दिल्या. | मा.सदस्य, तथा सह संचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे / सदस्य सचिव |
| ५ | **विषय क्र.६** | नगर परिषदांकडून प्राप्त प्रस्तावांवर चर्चा.<br><br>अ) सातारा नगरपरिषद :-<br>(i) सातारा नगरपरिषदे कडील दि.२८/०६/२०१९ रोजीची नोटीस क्र.सानप/ शवि/१७/९०११ मधील वारसा स्थळांच्या यादीतील सि.स.नं. ४४६, सदरबझार ऐवजी सि.स.नं.४४६ ई सदरबझार अशा शुध्दीपत्रकाबाबत. | सातारा नगरपरिषद हद्दीमधील सि.स.नं. ४४६, सदरबझार, पाळणाघर ही मिळकत अ.क्र.१४६ वर अंतर्भुत असुन, ग्रेड – IIB या वर्गीकरणातील आहे. पाळणाघर हे वारसा स्थळ सि.स.नं.४४६ या जागेत नसुन सदर वारसा स्थळ सि.स.नं.४४६ ई मध्ये असलेने, मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद यांनी सहायक संचालक, नगर रचना, सातारा शाखा कार्यालयाचे मार्गदर्शन अपेक्षिले होते. उक्त प्रकरणी सदर पाळणाघर ही हेरिटेज मिळकत सि.सं.न. ४४६ ई मध्येच असलेची खात्री होत असलेने, सहायक संचालक, नगर रचना, सातारा | ---- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | शाखा कार्यालयाकडील पत्र क्र.१९६२, दि.१६/०७/२०१९ अन्वये सदर दुरुस्ती करणेस हरकत नसलेचे कळविले आहे तसेच उक्त मिळकतीची प्रत्यक्ष पाहणी केली असता, वरीलप्रमाणे वस्तुस्थिती असलेची माहिती सदस्य सचिव यांनी दिली. प्रस्तुतचा बदल हा वस्तूस्थितीनुरुप असल्याने तो मान्य करणेचे सर्वानुमते ठरले. | |
| | | ब) महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषद :-<br>i) महाबळेश्वर येथील सेक्टर २, सि.स.नं.९९ रिपन हॉटेल या हेरिटेज ग्रेड – III या मिळकतीस कपाऊंड भिंत व दुरुस्ती परवानगीबाबत. | महाबळेश्वर गिरीस्थान नगर परिषद हद्दीतील सेक्टर क्र.-२, सि.स.नं.९९, "रिपन हॉटेल" ही मिळकत मंजुर यादीतील अ.क्र. २ वर हेरिटेज ग्रेड – III आहे. या हेरिटेज मिळकतीस कंपाऊंड भिंत व दुरुस्ती अपेक्षित असल्याची माहिती सदस्य सचिव यांनी दिली. सदर बैठकीस अर्जदार यांच्या वतीने प्रतिनिधी श्री.के.के.शहा उपस्थित होते. श्री. शहा यांनी कंपाऊंड भिंतीची डिझाईन व आडवा छेद (Cross Section) शी संबंधित नकाशा समितीसमोर सादर केला. सदर प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन सि.स.नं.९९ रिपन हॉटेल या हेरिटेज ग्रेड III या मिळकतीस कंपाऊंड भिंत बांधण्यास समितीची मान्यता देण्यात आली. वारसा स्थळांच्या इमारतीमधील पुनर्बांधणी / दुरुस्तीबाबतच्या प्रस्तावाचे सर्व तपशिलासह सादरीकरण पुढील बैठकीत संबंधितांनी सादर केल्यानंतर सर्व सदस्यांकडुन मिळकतीची पाहणी करुन याबाबतचा निर्णय घेण्यात येईल, असा निर्णय मा.अध्यक्ष यांनी दिला. त्यानुसार सविस्तर आदेश तयार करण्याच्या सूचना सदस्य सचिव यांना मा.अध्यक्षांनी दिल्या. | मा.अध्यक्ष / सदस्य सचिव / मुख्याधिकारी, महाबळेश्वर गिरिस्थान नगर परिषद. |
| | | ii) महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषद हद्दीतील सि.स.नं.१९७, माऊंट माल्कम ग्रेड-IIA ही मिळकत हेरिटेज यादीमधुन वगळणेबाबत. | महाबळेश्वर गिरीस्थान नगर परिषद हद्दीतील सेक्टर क्र.-२, सि.स.नं.१९७, "माऊंट माल्कम" ही मिळकत मंजुर यादीतील अ.क्र. १०० वर हेरिटेज ग्रेड – IIA आहे. सदर मिळकत हेरिटेज यादीमधुन वगळणेबाबत अर्जदार मेकवेव्हज सी रिसॉर्ट मुंबई यांनी समितीच्या नांवे अर्ज दाखल केला असुन, सदर अर्जाच्या अनुषंगाने मिळकतीची पाहणी करुन निर्णय घेणेचे मागील बैठकीत ठरले होते. त्यानुसार सर्व समिती सदस्यांच्या उपस्थितीत बैठकीपुर्वी सदर वारसा स्थळाची पाहणी केली.<br><br>तद्नंतर झालेल्या बैठकीमध्ये या विषया -बाबतचे सादरीकरण आर्किटेक्ट श्री.डी.डी.भागवत यांनी केले. यावेळी सदर मिळकत ही भुंकपप्रवण क्षेत्रात येत असलेने व पुर्णपणे जिर्ण अवस्थेत असल्याने सदर इमारत दुरुस्त करणे शक्य नाही तसेच जागेवरील सर्व इमारती पडलेल्या असुन, वापरण्यास अयोग्य व | मा.अध्यक्ष / सदस्य सचिव / मुख्याधिकारी, महाबळेश्वर नगर परिषद |

धोकादायक असलेने सदरची मिळकत वारसा स्थळांच्या यादीमधुन वगळणे आवश्यक आहे, यापूर्वी तत्कालीन सहायक संचालक, नगर रचना, सातारा तसेच मा.संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सदरची मिळकत वारसा स्थळांच्या यादीमधुन वगळणेबाबत शासनाकडे शिफारस केली असुन महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषदेच्या महासभेने देखील सदर मिळकत वारसा स्थळांच्या यादीमधुन वगळणेबाबत ठराव यापुर्वी केला असलेची माहिती देऊन सदर मिळकत वारसा स्थळांच्या यादीमधुन वगळणेची विनंती समितीस केली.

याबाबत मा.सदस्य, श्री.अविनाश पाटील सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे यांनी यापूर्वीचे अधिकारी यांनी काय लिहिले, याबाबत सखोलात न जाता, माऊंट माल्कम यांनी महाबळेश्वर वसविले असुन, त्यांच्या नावाची ही वास्तू असलेने अशा वास्तूंच्या जतन / संवर्धनाबाबत निष्ठापूर्वक योग्य निर्णय घेणे आवश्यक आहे, असे मत मांडले. त्यावर सर्व समिती सदस्यांनी सहमती दर्शविली.

या जागेवरील सर्व इमारती वापरण्यायोग्य नसलेले व पडीक अवस्थेत असलेने ही मिळकत वारसा स्थळांच्या यादीतुन वगळणे हे योग्य होणार नाही. ही वास्तु महाबळेश्वर वसविलेल्या माऊंट माल्कम यांच्या वास्तवाशी निगडीत असलेने या परिसरातील दोन इमारतींचे जतन करणे आवश्यक असलेचे मत मा.सदस्य, सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे श्री.अविनाश पाटील यांनी केले.

पूनर्बांधणीसंदर्भाने चर्चा होताना, सद्यस्थितीत अर्जदार / विकासक यांना काय विकास परवानगी अपेक्षित आहे, याबाबत मा.अध्यक्ष यांनी विचारणा केली असता, सदस्य सचिवांनी सविस्तर व अर्जदारांकडुन प्राप्त असणारी वस्तूस्थितीदर्शक माहिती दिली.

मा.सदस्य, डॉ. जय सामंत यांनी या मिळकतीमधील मुख्य इमारतीचे सिटी सर्व्हे शीटवरील फुट प्रिंट नुसार जतन होणे आवश्यक असलेने, या मिळकतीचे जुने फोटो शोधून त्यानुसार सदर इमारतीचा विकास करणे आवश्यक असलेचे मत मांडले.

मा.सदस्य, श्री.चेतन सहस्त्रबुध्दे यांनी तयार केलेले नकाशे जुन्या इमारतीप्रमाणे दिसुन येत नसलेने, जागेवरील मोजमापाप्रमाणे मुख्य इमारत व त्यालगतची एक इमारत अशा दोन इमारती आहे त्याच फुटप्रिंटवर बांधणे आवश्यक असलेचे मत मांडले.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | याबाबत सविस्तर चर्चा होऊन, सिटी सर्व्हे शिट व अर्जदार / विकासक यांनी तयार नकाशे पाहता, मूळ जोते वेगळे असुन, नवीन प्रस्तावातील जोते वेगळे आहेत. मुख्य इमारत व या इमारतीचे लगत असलेली दुसरी इमारत अशा दोन इमारतींची पुनर्बांधणी करणे आवश्यक आहे. उर्वरीत इमारतींचा शिल्लक एफ.एस.आय. वापरुन वेगळ्या जागेवर बांधकाम करता येईल. तथापि, सदर मिळकत हेरिटेज ग्रेड –IIA असलेने, सदर मिळकतीमध्ये नवीन बांधकाम अनुज्ञेय नाही. सदर मिळकत ग्रेड IIA मधुन ग्रेड III केल्यास इतर इमारतींचे नवीन बांधकाम देखील अनुज्ञेय होईल. उक्त मिळकतीचे स्थान व माऊंट माल्कमच्या नांवाने सदर वास्तु असलेची बाब विचारात घेता, या मिळकतीमधील मुख्य इमारत व त्यालगत असलेली दुसरी इमारत या दोन इमारतींचा जोता अबाधित ठेवणे आवश्यक असल्याने, या दोन इमारतींची पुनर्बांधणी तसेच अन्य ठिकाणी शिल्लक एफ.एस.आय. वापरुन नवीन दुय्यम इमारती प्रस्तावित करणेच्या अनुषंगाने सदर मिळकत हेरिटेज ग्रेड IIA ऐवजी III करणेस मा.अध्यक्ष यांनी सार्वनूमते मान्यता दिली तसेच एफ.एस.आय. तपासणे ही बाब नगरपरिषद व नगर रचना विभागाशी संबधित असल्याने याबाबत योग्य ती छाननी त्यांचे स्तरावर करण्यात यावी, असे मा.अध्यक्ष यांनी नमुद केले. मुख्य इमारतीचे दोन जोत्यावर नवीन इमारत बांधण्यास व उर्वरित जोत्यावर एफ.एस.आय. उपलब्धीनुसार बांधकाम परवानगी देणेस हरकत नसल्याचे मा.अध्यक्ष यांनी स्पष्ट केले.<br><br>वर नमूदनुसार समितीच्या मान्यतेनुसार सविस्तर आदेश पारीत करावेत व महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषदेने सदर मिळकतीचे ग्रेड बदल करणेबाबत नियमावलीतील संबंधित विनियम क्र.४ अंतर्गत विहित व योग्य ती कार्यवाही करावी, अशा सूचना मा.अध्यक्ष, यांनी दिल्या. | |
| | | iii) महाबळेश्वर सेक्टर-१, डॉ.साबणे रोड येथील सि.स.नं.२६७ मधील इमारतीच्या नवीन बांधकाम परवानगीबाबत. | महाबळेश्वर गिरीस्थान नगर परिषद हद्दीतील सेक्टर क्र.-१, सि.स.नं.२६७, ही मिळकत मंजुर यादीतील अ.क्र. १ वर हेरिटेज ग्रेड - III "बाजार" सन्मुख आहे. सि.स.नं.२६७ ही मिळकत मंजुर विकास योजना, महाबळेश्वर (दू.सु.) नुसार सार्वजनिक / निमसार्वजनिक वापर विभागात समाविष्ट असुन अर्जदार यांनी या जागेत वाणिज्य स्वरुपाचे बांधकामास परवानगी अपेक्षिली असल्याची माहिती सदस्य सचिव यांनी दिली. याबाबत सविस्तर चर्चा होऊन सदर जागेची पाहणी करुन व कागदपत्रांचा अभ्यास करुन विषयांकित बांधकाम परवानगीबाबत सविस्तर अहवाल पुढील | सदस्य सचिव, / स.सं.न.र., सातारा / मुख्याधिकारी, महाबळेश्वर नगर परिषद. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | बैठकीपुर्वी सादर करणेबाबतच्या सूचना सर्वानुमते मा.अध्यक्ष यांनी मुख्याधिकारी, महाबळेश्वर नगर परिषद यांना दिल्या होत्या. तथापि, सदर प्रकरणी मुख्याधिकारी, महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषद यांचा अहवाल अद्याप प्राप्त झाला नसलेची माहिती सदस्य सचिव यांनी दिली. याबाबत विचारणा केली असता, नगरपरिषदेचे प्रतिनिधी यांनी सदर मिळकतीस महाराष्ट्र नगरपंचायत, नगरपरिषद व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १९५ अन्वये नोटीस दिली असलेची माहिती समितीस दिली. प्रस्तुत प्रकरणासन्मुखचा रस्ता म्हणजेच 'बाजार' ही हेरिटेज ग्रेड-III मिळकत असुन यामध्ये केवळ फसाडशी (दर्शनिय भागाशी) संबंधित बाब समितीच्या कार्यकक्षेतील आहे. उर्वरित बाबी जशा अनुज्ञेय वापर, चटई क्षेत्र निर्देशांक अनुषंगानेच्या बाबी महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषद व नगर रचना विभागाशी संबंधित आहेत. त्यामूळे समितीशी संबंधित मुद्यांवर संबंधितांनी समितीपूढे सादरीकरण करणे आवश्यक असल्याने त्यानुरुप कार्यवाही करणेच्या सूचना मा.अध्यक्ष यांनी दिल्या. | |
| | | iv) महाबळेश्वर नगर परिषद हद्दीतील डॉ.साबणे रोड सन्मुख सि.स.नं.२८१, सेक्टर क्र.-१ या मिळकतीमध्ये टेरेसवर मोबाईल टॉवर बांधणेस परवानगी मिळणेबाबत | महाबळेश्वर गिरीस्थान नगर परिषद हद्दीतील सेक्टर क्र.-१, सि.स.नं.२८१, ही मिळकत मंजुर यादीतील अ.क्र. १ वर हेरिटेज ग्रेड – III "बाजार" सन्मुख आहे. डॉ.साबणे रोड सन्मुख मध्ये विषयांकित सि.सं.न. २८१ या मिळकतीवरील इमारतीच्या टेरेसवर मोबाईल टॉवर बांधणेस परवानगी मिळणेबाबत बी.एस.एन.एल. यांची विनंती असुन उच्चस्तरीय सनियंत्रण समितीने 'The proposal was discussed in the meeting and committe has given approval on the condition that approval from the Heritage Committe is also be taken', असा निर्णय दिला असल्याचे तसेच सदर प्रकरणी मोबाईल टॉवर बांधणेस मा.आमदार श्री.मकरंद पाटील यांनी परवानगी त्वरित देणेबाबत सूचना दिली असल्याची माहिती महाबळेश्वर नगर परिषदेचे प्रतिनिधी दिली.<br><br>सदर टॉवरचे बांधकाम सि.सं.न. २८१ या मिळकती मध्ये करणेचे प्रस्तावित असुन, उक्त जागेवरील बांधकामास महाबळेश्वर नगर परिषदेकडुन रितसर परवानगी प्राप्त असलेने तसेच सदरची सि.स.नं. २८१ ही मिळकत डॉ.साबणे रोड ते मागील बाजुस असणाऱ्या मरीपेठ रस्त्यापर्यंत असुन, सदरचा टॉवर या मिळकतीचे मागील म्हणजेच मरी पेठ या रस्त्यास सन्मुख बसविणार असलेचे महाबळेश्वर नगर परिषदेच्या प्रतिनिधीकडुन स्पष्ट करण्यात आले. त्यानुसार मरा पेठ या रस्त्याचा अंतर्भाव वारसा स्थळांच्या | मा.अध्यक्ष / सदस्य सचिव |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | यादीमध्ये नसलेने, याठिकाणी टॉवर उभारण्यास हरकत नसलेबाबत चर्चा होऊन, सर्वानूमते सदर टॉवरचे बांधकामास मान्यता देण्यात आली. | |
| | | v) महाबळेश्वर येथील महाबळेश्वर क्लब ग्रेड -I या जागेतील काही जुन्या इमारती पाडून त्याच ठिकाणी नवीन इमारतीच्या बांधकामाबाबत. | महाबळेश्वर गिरीस्थान नगर परिषद हद्दीतील सेक्टर क्र.-२, सि.स.नं.१०६, १०७ व १०८ "क्लब महाबळेश्वर" ही मिळकत मंजुर यादीतील अ.क्र. ६२ वर हेरिटेज ग्रेड - I आहे. मागील बैठकीत ठरल्याप्रमाणे या मिळकतीची प्रत्यक्ष पाहणी सर्व समिती सदस्यांनी बैठकीपूर्वी केली.<br><br>दुपारी झालेल्या बैठकीत या विषयाबाबतचे सादरीकरण आर्किटेक्ट श्रीमती प्रिती मेनन, आर्किटेक्ट श्री.विठ्ठल सुतार व स्ट्रक्चरल इंजिनिअर श्री शिवाजी वांद्रे यांनी केले.<br><br>महाबळेश्वर शहराच्या सिटी सर्व्हे शीटस सन १९८६ साली तयार केल्या आहेत. या सिटी सर्व्हे शीट व्यतिरीक्त असलेली सर्व अनधिकृत बांधकाम प्रथमत: पाडणेबाबत मागील बैठकीत निर्णय झाल्यानुसार सर्व बांधकामे पाडुन टाकली असलेची माहिती श्रीमती मेनन यांनी देवुन याबाबतचे फोटोसह सादरीकरण केले. या परिसरातील नियोजित बांधकामाच्या नकाशावर निर्देशित इमारत क्र.१,४, ८, १०, ११, १४, १५ व पी या सर्व इमारती जागेवर आस्तित्वात आहेत तसेच महाबळेश्वर शहराच्या सिटी सर्व्हे शीटसवर सदर इमारती असलेने, या इमारतींचे विद्यमान जोत्यावरच या सर्व इमारतींची पुनर्बांधणी आवश्यक असलेने तसा महाबळेश्वर क्लबकडील प्रस्ताव असल्याचा मुद्दा त्यांनी नमुद केला.<br><br>मा.सदस्य, डॉ.जय सामंत यांनी सदर प्रस्ताव हा पुनर्बांधणीचा असलेने, या सर्व इमारतींचे फोटो उपल्बध आहेत अगर कसे, याबाबत विचारणा केली. सदर इमारतींचे सर्व फोटो उपलब्ध असलेचे श्रीमती मेनन यांनी नमुद केले.<br><br>मा.सदस्य, श्री चेतन सहस्त्रबुध्दे यांनी या प्रस्तावित इमारतीपैकी एका इमारतीमध्ये थिएटर प्रस्तावित असलेने, थिएटरच्या अनुषंगाने काय तरतुदी केल्या आहेत, याबाबत विचारणा केली.<br><br>या पुनर्बांधणी प्रस्तावांपैकी पी ही इमारत पूर्व मंजुर बांधकाम परवानगीमध्ये दिसुन येत नाही. तथापि, सदर फुटप्रिंट केवळ सिटी सर्व्हे शीटवर असलेने, सदर इमारत समजावी की जोता, याबाबत संभ्रम निर्माण होत आहे. प्रत्यक्ष पाहणीवेळी देखील त्याठिकाणी बांधकामाशी संबंधित काही खुणा दिसुन आल्या. मात्र, त्यावरुन त्याठिकाणी यापुर्वी अस्तित्वातील बांधकाम होते | मा.अध्यक्ष / सदस्य सचिव / स.सं.न.र. सातारा / मुख्याधिकारी, महाबळेश्वर गिरिस्थान नगर परिषद |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | किंवा कसे, हे समजुण येत नसल्याचा निष्कर्ष समिती सदस्यांनी काढला. परंतु मा.अध्यक्ष यांनी स्पष्ट केले की, सन १९८२ चे सिटी सर्व्हे शिटसवर फुटप्रिंट असल्याने ती इमारत अस्तित्वात होती, असे गृहीत धरण्यात यावे. असे असले तरी प्रस्तुतची मिळकत सि.स.नं.१०४ ही विद्यमान सार्वजनिक रस्त्यामूळे विभागली जात आहे व त्यामुळे या ठिकाणी विहित निकषांची पूर्तता होत असल्याने पुनर्बांधणीनुषंगाने विचार करावा.<br><br>मा.अध्यक्ष यांनी, प्रस्तावातंर्गत सि.सं.न. १०५ या मिळकतीचा समावेश हेरिटेज मिळकतीमध्ये नसल्याने, याठिकाणी प्रस्तावित ओव्हरहेड पाण्याच्या टाकीच्या पुनंर्बांधकामास समितीने अभिप्राय देणेची आवश्यकता नसलेने नगर परिषद ही परवानगी देऊ शकते, असे मत मांडले.<br><br>उर्वरित सर्व विद्यमान इमारतींच्या अधिकृततेबाबत तपासणी केल्यानंतर ज्या विद्यमान इमारती मूळ मंजुर नकाशावर/ सिटी सर्व्हे शीटसवर अस्तित्वात आहेत, अशा इमारतींची पुनर्बांधणी अनुज्ञेय करणेबाबत सर्वानुमते निर्णय घेण्यात आला. अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांक व अनुज्ञेय बांधकाम क्षेत्राबाबत नगर रचना विभाग व महाबळेश्वर नगरपरिषदेने सविस्तर छाननी करुन व त्याप्रमाणे परवानगी द्यावी, अशा सूचना मा.अध्यक्ष यांनी दिल्या. | |
| | | क) पांचगणी गिरीस्थान नगरपरिषद :-<br>(i) पांचगणी गिरीस्थान नगरपरिषद हद्दीतील अंतिम भू.क्र.४६३ व ४६४ नगर रचना योजना क्र.३ सुधारित बांधकाम परवानगीबाबत. | पांचगणी गिरीस्थान नगरपरिषद हद्दीतील अंतिम भू.क्र.४६३ व ४६४ नगर रचना योजना क्र.३ ही मिळकत बाथा हायस्कुल (Compund Well Incougruent) या नावाने मंजुर वारसा स्थळांच्या यादीनुसार अ.क्र.४ वर हेरिटेज ग्रेड - IIB मध्ये आहे. सदर जागेवरील सुधारीत बांधकाम परवानगीचा प्रस्ताव सादर असलेने, बैठकीपुर्वी सदर जागेची पाहणी सर्व समिती सदस्यांनी केली. बैठकीमध्ये या विषयाच सादरीकरण अर्जदार यांचे प्रतिनिधी आर्किटेक्ट श्री.संतोष कुलकर्णी यांनी केले. या मिळकतीमध्ये बाथा हायस्कुल ट्रस्टमार्फत चालवले जात असुन या शाळेत गरजु ४०० ते ५०० विद्यार्थी शिक्षण घेत असुन, या इमारतीमध्ये लायब्ररी, डॉर्मेटरी, किचन, वर्ग खोल्या इत्यादी विद्यमान वापरात असुन, गरज लागेल त्यानुसार बाथा हायस्कुल या हेरिटेज बंगल्या भोवती अर्जदार संस्थेने विना परवाना बांधकाम केले असुन, सर्व इमारती विखुरल्या आहेत. आता, सादर केलेल्या प्रस्तावामध्ये विना परवाना बांधलेल्या सर्व इमारती पाडुन नियोजनपूर्वक सर्व इमारती एकमेकालगत | सदस्य सचिव / स.सं.न.र., सातारा / मुख्याधिकारी, पांचगणी गिरिस्थान नगर परिषद. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | पुरक वापराच्या अनुषंगाने प्रस्तावित केल्या आहेत तसेच मुख्य इमारतीच्या समोर पुर्व बाजुस मोकळ्या जागेत शाळेची इमारत प्रस्तावित केली आहे तसेच हेरिटेज बंगल्याच्या मागिल बाजुस विद्यमान शाळेच्या इमारतीमधील वर्ग खोल्या खुपच छोट्या असुन, याठिकाणी विनियमानुसार योग्य अकाराच्या खोल्या प्रस्तावित केल्या आहेत, असे वास्तुविशारद श्री.संतोष कुलकर्णी यांनी समिती सदस्यांपुढे विषद केले.<br><br>समिती सदस्य, डॉ.जय सामंत यांनी विद्यमान व प्रस्तावित फुटप्रिंट बाबत विचारणा करुन प्रस्तावित नकाशे पाहता, फुटप्रिंट जास्त वाटतेय, असे नमुद केले. यावेळी या मिळकतीचा शिल्लक एफ.एस. आय. वापरुन इमारत प्रस्तावित केली असुन मुख्य इमारत वगळता अन्य इमारती वापरण्यास योग्य नसलेचा दाखला सांधणी अभियंता श्री.श्रीराम कुलकर्णी यांनी दिला असुन, ही मिळकत भुंकपप्रवण क्षेत्रात येत असल्याने, या इमारती वापरण्यास योग्य नसलेचा दाखला दिला असलेचे श्री.संतोष कुलकर्णी यांनी नमुद केले.<br><br>समिती सदस्य श्री.रवी रानडे यांनी मुख्य इमारत सुरक्षित आहे अगर कसे ? याबाबत विचारणा केली. याअनुषंगाने मुख्य इमारत वापरण्यास सुरक्षित असलेबाबतचा दाखला सांधणी अभियंता श्री श्रीराम कुलकर्णी यांनी दिला असलेची माहिती अर्जदार यांचे प्रतिनिधी यांनी दिली. प्रस्तुत मिळकतीमधील क्षेत्र तपशिल व प्रस्तावित इमारतींच्या सन्मुख इमारतीचे स्थान हे सद्यस्थितीत विद्यार्थ्यांकरिता खेळाचे मैदान म्हणुन सद्यस्थितीत वापरात असलेल्या जागेवर आहे. प्रस्तुतची इमारत मुख्य इमारतीच्या दुय्यम स्वरुपात विकसित होणे अभिप्रेत आहे. त्याचबरोबर खेळाच्या मैदानाकरिता किमान आवश्यक क्षेत्र शिल्लक राहते किंवा कसे, याबाबत सविस्तर तपासणी करुन अर्जकर्त्या संस्थेने व त्यांचे वास्तुविशारद यांनी सविस्तर प्रस्ताव तयार करुन पुढील बैठकीपूर्वी पांचगणी नगर परिषदेकडे सादर करुन सहायक संचालक, नगर रचना, सातारा शाखा व पांचगणी नगर परिषदेने यास अनुसरुन पुढील बैठकीवेळी सविस्तर माहिती समितीपुढे सादर करण्याच्या सूचना मा.अध्यक्षांनी दिल्या. | |
| | | ड) वाई नगरपरिषद :-<br>(i) वाई नगरपरिषद हद्दी मधील सि.स.नं.३१४ या हेरिटेज ग्रेड-II बी या मिळकतीच्या पहिल्या मजल्याचा भाग पाडण्यासाठी परवानगी मिळणेबाबत. | बैठकीपूर्वी वाई नगरपरिषद हद्दीतील प्राज्ञ पाठ शाळा यांचे मालकीचे सि.सं.नं.३१४ ही हेरिटेज ग्रेड- IIB या मिळकतीची पाहणी केली. बैठकीवेळी या इमारतीपैकी समोरील पहिला मजल्याचा काही भाग धोकादायक झाला असलेने, सदर भाग पाडण्यासाठी परवानगी मिळणेबाबत अर्जदार | सदस्य सचिव / मुख्याधिकारी, वाई नगर परिषद. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | संस्थेने विनंती केली असलेची माहिती सदस्य सचिव यांनी दिली. याबाबत अर्जदार संस्थेने सादरीकरण केले नसलेने, पुढील बैठकीत सादरीकरण करुन याबातचा निर्णय घेता येईल, असा सर्वानूमते निर्णय घेण्यात आला. | |
| | | (ii) वाई नगरपरिषद हद्दी मधील सि.स.नं.४२४ पेठ मधली आळी, या हेरटेज ग्रेड-II मधील मिळकती मधील बांधकाम परवानगी बाबत. | बैठकीपूर्वी वाई नगरपरिषद हद्दीतील सि.सं.नं.३१४ ही हेरिटेज ग्रेड- IIB या मिळकतीची पाहणी केली. प्रस्तावित बांधकामाच्या अनुषंगाने अर्जदार यांनी सविस्तर सादरीकरण केले नसलेने, पुढील बैठकीत सादरीकरण करुन याबातचा निर्णय घेता येईल, असा सर्वानूमते निर्णय घेण्यात आला. | सदस्य सचिव / मुख्याधिकारी, वाई नगर परिषद. |
| | | (iii) वाई नगरपरिषद हद्दी मधील सि.स.नं.२३९९-अ व इतर, पेठ सोनगिरवाडी या हेरिटेज ग्रेड-II बी या मिळकतीमधील बांधकाम परवानगीबाबत. | बैठकीपूर्वी वाई नगरपरिषद हद्दीतील सि.सं. नं.२३९९अ व इतर या हेरिटेज ग्रेड- IIB या मिळकतीची पाहणी समिती सदस्यांनी केली. प्रस्तावित बांधकामाच्या अनुषंगाने अर्जदार यांनी सविस्तर सादरीकरण केले नसलेने, पुढील बैठकीत सादरीकरण करुन याबातचा निर्णय घेता येईल, असा सर्वानूमते निर्णय घेण्यात आला. | सदस्य सचिव / मुख्याधिकारी, वाई नगर परिषद. |
| | | (iv) कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग यांचे दि.१८/०७/२०१९ चे पत्रान्वये महाराष्ट्र राज्य निर्मिती मंडळ, वाई येथील प्रस्तावित बांधकामाचे प्रकरणाबाबत. | बैठकीपूर्वी वाई नगरपरिषद हद्दीतील विषयांकित मिळकतीची पाहणी केली. प्रस्तावित बांधकामाच्या अनुषंगाने अर्जदार यांनी सविस्तर सादरीकरण केले नसलेने, पुढील बैठकीत सादरीकरण करुन याबातचा निर्णय घेता येईल, असा सर्वानूमते निर्णय घेण्यात आला. | सदस्य सचिव / मुख्याधिकारी, वाई नगर परिषद. |
| ६ | **विषय क्र.७** | वारसा स्थळांबाबत प्राप्त तक्रार अर्जांवर चर्चा करणे.<br>अ) पांचगणी हेरिटेज मिळकत नं.७२, प्रेस्टन व प्रेस्टन कॉटेज हेरिटेज मिळकतीस हानी पोहचविले बाबत, नुकसान केलेबाबत. | विषयांकित तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दि.२८/०५/२०१९ चे पत्र क्र.१५०७ अन्वये मुख्याधिकारी, पांचगणी गिरिस्थान नगर परिषद, पांचगणी यांचा अहवाल अपेक्षिलेला आहे. सदर अहवाल अद्याप प्राप्त झाला नसल्याने सदरचा विषय पत्रिकेत ठेवला असल्याची माहिती सदस्य सचिव यांनी दिली. मागील बैठकीत याबाबतचा अहवाल त्वरित सादर करणेबाबतच्या सूचना मा.अध्यक्ष यांनी मुख्याधिकारी, पांचगणी नगर परिषद यांना दिल्या होत्या. तथापि, पांचगणी गिरीस्थान नगरपरिषदेने अद्याप अहवाल दिला नसल्याची माहिती सदस्य सचिव यांनी दिली. सदर तक्रार अर्जाबाबत पांचगणी गिरीस्थान नगरपरिषदेने कार्यवाही करुन उक्त अर्जावर कार्यवाही करावी, अशा सूचना मा.अध्यक्ष यांनी पांचगणी नगर परिषदेस दिल्या. | मुख्याधिकारी, पांचगणी नगर परिषद |
| | | आ) महाबळेश्वर येथील नगरपरिषद हद्दीतील हेरिटेज मिळकतीमध्ये समाविष्ट लिज होल्ड मिळकत सि.स.नं.५४ (व्हिले झीनीया बंगलो) मणील बेकायदेशीर बांधकामाबाबत | विषयांकित तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दि.०३/०१/२०१९ चे पत्र क्र.८९ अन्वये मुख्याधिकारी, महाबळेश्वर गिरिस्थान नगर परिषद, महाबळेश्वर यांचा अहवाल अपेक्षिलेला आहे. मागील बैठकीत सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने अहवाल त्वरित सादर करणेबाबतच्या | मुख्याधिकारी, महाबळेश्वर नगर परिषद |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ॲड. प्रभाकर रामचंद्र हिरवे व प्रकाश लक्ष्मण हिरवे यांचा तक्रार अर्ज. | सूचना मा.अध्यक्ष यांनी मुख्याधिकारी, महाबळेश्वर नगर परिषद यांना दिल्या होत्या. तथापि, महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषदेने अद्याप अहवाल दिला नसल्याची माहिती सदस्य सचिव यांनी दिली. सदर तक्रार अर्जाबाबत महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषदेने कार्यवाही करुन उक्त अर्जावर कार्यवाही करावी, अशा सूचना मा.अध्यक्ष यांनी महाबळेश्वर नगरपरिषदेस दिल्या. | |
| | | इ) महाबळेश्वर येथील सि.स.नं.१३३/ब या मिळकती मधील बांधकामाबाबत चालु असलेल्या चौकशीबाबत- सौ सुलोचना दत्तात्रय बावळेकर यांचा तक्रार | विषयांकित तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दि.१३/११/२०१८ चे पत्र क्र.३५६२ अन्वये मुख्याधिकारी, महाबळेश्वर गिरिस्थान नगर परिषद, महाबळेश्वर यांचा अहवाल अपेक्षिलेला आहे. मागील बैठकीत सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने अहवाल त्वरित सादर करणेबाबतच्या सूचना मा.अध्यक्ष यांनी मुख्याधिकारी, महाबळेश्वर नगर परिषद यांना दिल्या होत्या. तथापि, महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषदेने अद्याप अहवाल दिला नसल्याची माहिती सदस्य सचिव यांनी दिली. सदर तक्रार अर्जाबाबत महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषदेने कार्यवाही करुन उक्त अर्जावर कार्यवाही करावी, अशा सूचना मा.अध्यक्ष यांनी महाबळेश्वर नगरपरिषदेस दिल्या. | मुख्याधिकारी, महाबळेश्वर नगर परिषद |
| | | ई) महाबळेश्वर येथील सि.स.नं.५४, व्हिला झीनीया, सि.स.नं.५१ व ६६, लॅव्होना, तसेच सि.स.नं.६० व ८६, व्हॅली व्ह्‌ू या शासकीय भाडेपट्टा हेरिटेज मिळकतीवरील अनाधिकृत बाधकामाबाबत - श्री प्रभाकर आर.हिरवे यांचा तक्रार अर्ज. | विषयांकित तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दि.१३/११/२०१८ चे पत्र क्र.३५६१ अन्वये मुख्याधिकारी, महाबळेश्वर गिरिस्थान नगर परिषद, महाबळेश्वर यांचा अहवाल अपेक्षिलेला आहे. मागील बैठकीत सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने अहवाल त्वरित सादर करणेबाबतच्या सूचना मा.अध्यक्ष यांनी मुख्याधिकारी, महाबळेश्वर नगर परिषद यांना दिल्या होत्या. तथापि, महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषदेने अद्याप अहवाल दिला नसल्याची माहिती सदस्य सचिव यांनी दिली. सदर तक्रार अर्जाबाबत महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषदेने कार्यवाही करुन उक्त अर्जावर कार्यवाही करावी, अशा सूचना मा.अध्यक्ष यांनी महाबळेश्वर नगरपरिषदेस दिल्या. | मुख्याधिकारी, महाबळेश्वर नगर परिषद |
| | | उ) हेरीटेज कमिटीच्या दुजाभाव कारभारामुळे स्थानिक मिळकत धारकांना होत असलेल्या नाहक त्रासाबाबत- राजेश कुंभारदरे व इतर यांचा तक्रार अर्ज | विषयांकित तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दि.१३/११/२०१८ चे पत्र क्र.३५६३ अन्वये मुख्याधिकारी, महाबळेश्वर गिरिस्थान नगर परिषद, महाबळेश्वर यांचा अहवाल अपेक्षिलेला आहे. मागील बैठकीत सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने अहवाल त्वरित सादर करणेबाबतच्या सूचना मा.अध्यक्ष यांनी मुख्याधिकारी, महाबळेश्वर नगर परिषद यांना दिल्या होत्या. तथापि, महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषदेने अद्याप अहवाल दिला नसल्याची माहिती सदस्य सचिव यांनी दिली. सदर तक्रार अर्जाबाबत महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषदेने कार्यवाही करुन उक्त अर्जावर कार्यवाही करावी, अशा सूचना मा.अध्यक्ष यांनी महाबळेश्वर नगरपरिषदेस दिल्या. | मुख्याधिकारी, महाबळेश्वर नगर परिषद |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | **विषय क्र.८** | आयत्या वेळचे विषय<br>(i) महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषद हद्दीतील सि.स.नं.५१, सेक्टर क्र.२, ऐव्हॉनो बंगला या भाडेपट्टा मिळकती मधील आऊट हाऊसचे बांधकामाबाबत. | महाबळेश्वर गिरीस्थान नगर परिषद हद्दीतील सेक्टर क्र.-२, सि.स.नं.५१, "ऐव्हॉनो" ही मिळकत मंजुर यादीतील अ.क्र. २३ वर हेरिटेज ग्रेड - III आहे. महाबळेश्वर येथील, सेक्टर क्र.२, सि.स.नं.५१ इव्हॉनो ही मिळकत तत्कालीन मंजुर महाबळेश्वर शहराच्या वारसा स्थळांच्या यादीमध्ये ग्रेड-I मध्ये अंतर्भुत होती. त्यामधील इमारतींच्या दुरुस्तीस व कोयना भुकंपामध्ये पडलेल्या आऊट हाऊस नं. १ व २ च्या पुनर्स्थापनेच्या प्रस्तावास दि.०७/११/२००९ रोजीच्या महाबळेश्वर - पांचगणी वारसा स्थळ जतन समितीने काही अटींसापेक्ष मान्यता दिलेली आहे. सदर मान्यतेस अनुसरुन सहायक संचालक, नगर रचना, सातारा शाखा कार्यालयाकडील पत्र क्र. २०३०, दि.१८/०८/२०१० अन्वये मुख्य इमारतीच्या टॉयलेट ब्लॉक या इमारतीच्या दुरुस्तीस काही अटीं / शर्तीसापेक्ष मंजुरीकामी मुख्याधिकारी, महाबळेश्वर नगर परिषद यांचेकडे शिफारस केली असुन, आऊट हाऊस नं.१ या बांधकामाच्या, बांधकाम आराखडयातील हद्दी या मोजणी नकाशा तसेच अभ्यासगटाच्या नकाशावरील बांधकाम संरचना हद्दीशी जुळत नसल्याने आऊट हाऊस नं.१ च्या दुरुस्तीस मंजुरीकामी शिफारस केलेली नाही तसेच आऊट हाऊस नं.२ चे स्थान हे उक्त भाडेपट्टा मिळकतींच्या अतिरिक्त (Surplus) क्षेत्रामध्ये येत असल्याने व अशा अतिरीक्त क्षेत्रामध्ये बांधकाम अनुज्ञेय नसल्याने आऊट हाऊस नं.२ या बांधकामास मंजुरीकामी शिफारस केलेली नाही. प्रस्तुतच्या आऊट हाऊस नं.२ अंतर्गतची जागा मंजूर विकास योजना, महाबळेश्वर (दु.सू.) नुसार शेती विभागात समाविष्ट असल्याने त्याठिकाणी प्राप्त परिस्थितीत बांधकाम अनूज्ञेय होऊ शकत नाही, याबाबतची माहिती सदस्य सचिव यांनी दिली. सद्यस्थितीत मंजुर वारसा स्थळांच्या यादीनुसार उक्त मिळकत हेरिटेज ग्रेड III मध्ये अंतर्भुत असलेने प्रस्तावित बांधकामापैकी आऊट हाऊस नं.१ चे पुनर्बांधकाम विद्यमान वारसा स्थळ जतन समितीचे मान्यतेने अनुज्ञेय होऊ शकेल. त्यानुसार अर्जदार यांनी सर्व कागदपत्रांसह नव्याने सविस्तरपणे सादरीकरणासह प्रस्ताव सादर केल्यास, प्रस्तुत मिळकतीची प्रत्यक्ष पाहणी करुन आऊट हाऊस नं.१ च्या पुनर्बांधणी बांधकामाबाबत गुणवत्तेनुसार निर्णय घेता येईल, असा निर्णय मा.अध्यक्ष यांनी दिला. | सदस्य सचिव / मुख्याधिकारी, महाबळेश्वर गिरिस्थान नगर परिषद. |
| | | (ii) हेरिटेज / हिस्टॉरिक टेल्स ॲन्ड राईडस, महाबळेश्वर यांच्या जतन व सवर्धनाबाबत. | श्री जयसिंह मारीवाला व इतर, व्दारा किशोर मनसुखाणी, रा.पुणे यांनी दि.०५/०७/२०१९ चे पत्रान्वये मा.अध्यक्ष यांना महाबळेश्वर नगरपरिषद हद्दीतील ऐतिहासिक खुणा/ पाऊलवाटांचे जतन व संवर्धन करणेचे अनुषंगाने विनंती केली असुन | मा.उप वनसंरक्षक, सातारा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | अर्जदार यांनी सन १८६२ साली तयार केलेला महाबळेश्वर येथील पाऊलवाटा दर्शविणारा नकाशा सादर केला असुन, सदर विषय समितीच्या बैठकीत ठेवणेबाबत मा.अध्यक्ष यांनी सुचना दिल्या असल्याची माहिती सदस्य सचिव यांनी दिली. उक्त विषयाच्या अनुषंगाने या कार्यालयाकडील पत्र क्र.२४६२, दि.०७/०९/२०१९ चे पत्रान्वये मा. उप वन संरक्षक, सातारा श्री भारत हाडा यांना विशेष निमंत्रित म्हणुन हजर राहणेबाबत विनंती करण्यात आले असलेचे माहिती दिली. या बैठकीस श्री.रणजित गायकवाड वन क्षेत्रपाल, महाबळेश्वर हे उपस्थित होते.<br><br>श्री.रणजित गायकवाड, वन क्षेत्रपाल, महाबळेश्वर, यांनी महाबळेश्वर येथील ऐतिहासिक पाऊलवाटा, पाऊलखुणा जतन करणेच्या अनुषंगाने ॲडव्होकेट श्री.अनिल व्ही. अंतुरकर, रा.पुणे यांनी दि.२८/०४/२०१९ रोजीचे वन विभागास दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने ब्रिटीशकालीन राईड व्यवस्थापनाबाबत वरिष्ठ वन अधिकारी तसेच संयुक्त वन व्यवस्थापन समिती पदाधिकारी यांची संयुक्त बैठक दि.२५/०६/२०१९ रोजी हिरडा वन विश्रामगृह, महाबळेश्वर येथील कॉन्फरन्स हॉल मध्ये झाली असुन, सदर समितीच्या बैठकीत या विषयाच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा होऊन, खराब झालेल्या ऐतिहासिक ब्रिटीशकालीन पाऊलवाटा जतन करण्याच्या अनुषंगाने सविस्तर अंदाजपत्रके तयार केली असुन, पाऊटवाटा दुरुस्तीबाबत व जुन्या पाऊलवाटा शोधुन त्याचे जतन करण्याच्या अनुषंगाने वन विभागामार्फत कार्यवाही सुरु असलेची माहिती त्यांनी दिली.<br><br>अर्जदार यांनी दिलेल्या ब्रिटीशकालीन नकाशानुसार ऐतिहासिक पाऊलवाटा त्यांचे महत्व विचारात घेवुन जतन करण्याच्या सूचना मा.अध्यक्ष यांनी वन विभागास दिल्या. | |
| | | ii) पुढील बैठकीची तारीख व वेळ निश्चित करणे. | सर्वानुमते समितीची पुढील बैठक विधानसभा निवडणुकी नंतर घेण्याचे ठरले. याबाबतची निश्चित तारीख व ठिकाण अलहिदा ठरविण्यात येईल. अशा सूचना मा.अध्यक्ष यांनी सदस्य सचिव यांना दिल्या. | सदस्य सचिव |

हिरडा वन विश्रामगृह, महाबळेश्वर येथील कॉन्फरन्स हॉल समितीच्या बैठकीसाठी उपलब्ध करुन दिल्याबद्दल वनविभागाचे आभार मानुन मा.अध्यक्ष यांच्या परवानगीने उपस्थितांचे आभार मानुन बैठक संपल्याचे सदस्य सचिव यांनी जाहीर केले .

| | |
|---|---|
| सही/*** | सही/*** |
| **(वि.ल.वाघमोडे)** | **(दिलीप बंड** I.A.S. (Retd) ) |
| सदस्य सचिव, | अध्यक्ष, |
| वारसा स्थळ जतन समिती, | वारसा स्थळ जतन समिती, |
| तथा | महाबळेश्वर, पांचगणी, वाई, सातारा नगर परिषद |
| सहायक संचालक, नगर रचना, सातारा | व महाबळेश्वर-पांचगणी प्रदेश |

---

जिल्हा परिषद विस्तारीत इमारत,
पहिला मजला, सातारा.
दुरध्वनी क्र.०२१६२/२३९२४१.
जा.क्र.वा.स.ज.स./बै.क्र.९/इतिवृत/ससंसा/ २८६९
दिनांक २१/०९/२०१९.
१०/१०/२०१९

प्रति,

१) मा.अध्यक्ष, वारसा स्थळ जतन समिती, महाबळेश्वर, पांचगणी, वाई, सातारा नगर परिषद व महाबळेश्वर-पांचगणी प्रदेश.
२) मा.जिल्हाधिकारी, सातारा.
३) मा. सदस्य, तथा सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे.
४) मा. सदस्य, श्री.रवी रानडे.
५) मा. सदस्य, श्री.जय शा.सामंत.
६) मा. सदस्य, श्री.शिवाजीराव चव्हाण.
७) मा. सदस्य, श्री.चेतन सहस्त्रबुध्दे.
८) मा. सदस्य, श्रीमती वैशाली प्रसाद लाटकर .
९) मा. सदस्य, श्री. अच्युत वाटवे.
१०) मा. सदस्य, सहायक संचालक, पुरातत्व विभाग, पुणे.
११) मा. सदस्य, मा.अधिक्षक, पुरातत्वविद, भारतीय पूरातत्व सर्वेक्षण, मुंबई सर्कल. मुंबई.
१२) मा. उप वन संरक्षक, सातारा.
१३) मुख्याधिकारी, सातारा नगर परिषद, सातारा.
१४) मुख्याधिकारी, महाबळेश्वर गिरिस्थान नगर परिषद, महाबळेश्वर.
१५) मुख्याधिकारी, पांचगणी गिरिस्थान नगर परिषद, पांचगणी.
१६) मुख्याधिकारी, वाई नगर परिषद, वाई.

२/- वारसा स्थळ जतन समितीचे दि.१३/०९/२०१९ रोजी झालेल्या अकराव्या बैठकीचे इतिवृत माहितीसाठी व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी.

१०/१०/२०१९
( वि.ल.वाघमोडे )
सदस्य सचिव,
वारसा स्थळ जतन समिती,
तथा
सहायक संचालक, नगर रचना,
सातारा.

१०/१०/२०१९